## अंतरंग

रोह्यातील इंद्रदेव धनगरवाडा आगीमुळे जळून खाक/२
कोकणात पारंपरिक शिमगोत्सवाची लगबग/५
तिरंदाज शर्वरी म्हामुणकरची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड/८

## जागतिक महिला दिनानिमित्त आज राज्यभर विशेष ग्रामसभा



**मुंबई :** महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबविणे महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली. या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. बालविवाह, जाचक विधवा प्रथा, अन्यायकारक अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच मुलींच्या जन्मदर वाढीसाठी या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

## सलाम नारीशक्तीला!



*एकेकाळी चूल आणि मूल या संकल्पनेत अडकलेल्या महिला, मुली शिकल्या. त्याचे परिणामस्वरूप तळागाळातील आदिवासी स्त्री आज भारताच्या राष्ट्रपती म्हणून सर्वोच्च पदावर विराजमान आहे. स्वकर्तृत्वावर महिला विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांच्या कामगिरीचा दै. रामप्रहरने घेतलेला आढावा...*

### प्रतिथयश लेखिका अरुणा भागवत



पोलादपूर येथील अरुणा अजित भागवत यांची प्रतिथयश लेखिका म्हणून ओळख आहे. आईकडून लेखन वारसा मिळवून विवाहानंतर त्या माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथे आल्या. शिक्षिकी पेशा आणि लहानग्या मुलांचे संस्कारवर्ग चालवताना लेखनाची आवड जोपासणाऱ्या भागवत यांची बालनाट्य निर्मितीपासून लेखनसेवा सुरू झाली. **(पान ६ वर..)**

### महिला वायरमन मोनिका औचटकर



वायरमन या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी. वायरमनचे काम तसे जोखमीचे व आव्हानात्मक. त्यामुळे महिला या क्षेत्रात येत नाहीत, परंतु मोनिका औचटकर हिने हे क्षेत्र निवडले. ती अलिबाग तालुक्यातील महाजने येथील मूळची रहिवासी. सध्या उसर येथे राहते आणि महावितरण कंपनीमध्ये वायरमन म्हणून पुरुषांप्रमाणे काम करते. **(पान ६ वर..)**

### वीटभट्टीवरील मुलांसाठी 'ती' बनली सरस्वती!



आदिवासी, कातकरी समाजातील कुटुंब वीटभट्टी कामगार म्हणून कायम स्थलांतरण करीत असतात. त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण होण्यात अडचणी असतात. हे चित्र पाहून नेरळ बिरदोले येथील बारावीत शिकणारी विद्यार्थिनी भाविका जामघरे ही तरुणी पुढे आली आणि त्या मुलांसाठी भाविकाने वीटभट्टीवरच अभिनव शाळा सुरू केली. **(पान ७ वर..)**

### उद्योजिका हर्षला साबळे



कर्जत तालुक्यातील पोसरी या ग्रामीण भागात राहणाऱ्या हर्षला साबळे यांनी स्पोर्ट्स गारमेंट उद्योग सुरू करून या परिसरातील महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. या उद्योगात यशस्वी होण्यासाठी त्यांचे पती योगेश साबळे यांचा अनुभव व मोलाचे मार्गदर्शन त्यांना लाभत आहे. त्यांच्या या उद्योगामुळे परिसरातील काही महिलांनाही रोजगार मिळत आहे. **(पान ७ वर..)**

# मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला राज्याच्या विकासाचा रोडमॅप

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शुक्रवारी (दि. ७) विविध विषयांवर चर्चा झाली. विधानसभेमध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचा रोडमॅप जाहीर केला. आगामी काळात महाराष्ट्राच्या विकासासाठी कोणते निर्णय घेण्यात आले आहेत याबद्दल मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले.



केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्य घर योजनेच्या धर्तीवर लवकरच राज्यात योजना तयार केली जात आहे. त्यातून दीड कोटी ग्राहक वीज बिलमुक्त होतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. आपण बळीराजा मोफत वीज योजना जाहीर केली. ४५ लाख कृषीधारकांना मोफत वीज देत आहोत. वर्षाला १४ हजार कोटी रुपये खर्च होणार आहे. अर्थमंत्र्यांनी या योजनेत कोणतीही कपात सूचवली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे, असे ते म्हणाले. **(पान २ वर..)**

### 'मी काय उद्धव ठाकरे आहे का?'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच्या सरकारच्या काळातील काही निर्णयांना स्थगिती दिल्याची व कामांची चौकशी सुरू करण्यात आल्याचा आरोप आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व चर्चा फेटाळून लावल्या तसेच विकासकामांना स्थगिती द्यायला मी काय उद्धव ठाकरे आहे का? असा सवाल करीत विरोधकांवर हल्लाबोल केला.

### जयंत पाटील यांनाही लगावला टोला

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी वीज वितरण कंपनीसंदर्भात भाष्य करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना, तुमचा प्रॉब्लेमच तो आहे की तुम्ही चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी राहता आणि चुकीच्या गोष्टी सांगता. योग्य गोष्टी योग्य लोकांसोबत योग्य वेळी सांगितल्या तर त्या कार्यान्वित होतात, असे म्हटले.

# आगीच्या घटनांवर होणार प्रतिबंधक उपाययोजना

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनांचा नियमात समावेश करणार —मंत्री माधुरी मिसाळ

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

इमारतींना लागणाऱ्या आगींना आळा घालण्यासाठी त्या संदर्भातील योग्य त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिले. इमारतींना लागणाऱ्या आगीबद्दल उपाययोजनांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियमात योग्य ती सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू असून त्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सूचनांचा समावेश केला जाईल, असेही त्यांनी सभागृहाला आश्वासित केले.





इमारतींना आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सन २०२४मध्ये मुंबईमध्ये सुमारे पाच हजार २९६ लहान-मोठ्या आगीच्या घटना घडून त्यात जवळजवळ २१ जणांचा मृत्यू आणि १७६ जण जखमी झाल्याचे जानेवारी २०२५मध्ये निदर्शनास आले. मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट परिसरातील ओबेरॉय संकुलातील स्कायर्पन इमारतीला लागलेल्या आगीत एका वृद्धाचा मृत्यू, तर अन्य एक जण जखमी झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय, अशासकीय, निमशासकीय व खासगी इमारतींमध्ये मोठ्या प्रमाणात अग्निशमन नियमावलीचे पालन न होणे, दाटीवाटीने उभारलेल्या इमारती, झोपड्यांचा विळखा व अनधिकृत बांधकामे इत्यादींमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तर दिले होते. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२३ मध्ये एकूण पाच हजार ७४ व सन २०२४मध्ये सुमारे पाच हजार ३०१ लहान-मोठ्या आगीच्या घटना घडल्या असून सन २०२४मध्ये लागलेल्या आगीच्या घटनांमध्ये २१ जणांचा मृत्यू आणि १७६ जण जखमी झाले आहेत. आग लागण्याच्या घटनांसाठी मुख्यतः सदोष विद्युत प्रवाह, ज्वलनशील पदार्थांचे निष्काळजीपणे हाताळणे अग्निशमन नियमावलीचे पालन न होणे इ. बाबी कारणीभूत असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३च्या कलम ४५ (अ)मध्ये लेखापरीक्षण (फायर ऑडिट) करण्याची तरतूद करण्यात आली असून ज्या इमारती कलम ४५मध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या मालक/भोगवटादारांनी प्रथम वर्षी लेखारीक्षण करणे व त्यांनतर प्रत्येक दोन वर्षातून एकदा लेखापरीक्षण करावयाचे आहे. लेखापरीक्षकाच्या नेमणुकीबाबत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियमात योग्य ती सुधारणा करण्याची कार्यवाही विभाग स्तरावर सुरू आहे. मुंबई अग्निशमन दलाकडून दर महिन्याला यादृच्छिक पद्धतीने इमारतींमधील अग्नी प्रतिबंधक व अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी केली जाते. **(पान २ वर..)**

# महिला दिनानिमित्त पनवेलमध्ये हिरकणी महोत्सव

## वर्षा ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हिरकणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ७) झाले.

उद्घाटन समारंभास आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, कैलास गावडे, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, डॉ. रूपाली माने, श्रीराम पवार, आदी उपस्थित होते.

या महोत्सवात बचत गटाच्या महिलांना उद्योग व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी



२५ बचत गटांचे स्टॉल्स ७,८,९ मार्च असे तीन दिवस असणार आहेत. याचबरोबर महिलांच्या आरोग्याची काळजी घेत विशेष अशा आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात विविध तपासण्या व चाचण्या करण्यात येत आहेत.

महिलांसाठी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक स्वयंसिद्धाच्या संचालिका, राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या तपस्वी गोंधळी व सहकाऱ्यांनी सादर केले, तर आजकाल होणाऱ्या सायबर फसवणुकीपासून आपला बचाव व्हावा याकरिता नवी मुंबईतील सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी मार्गदर्शन केले. यानंतर अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी महिलांच्या सदृढ आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या. मेघना संजय कदम यांच्या प्राणिक हिलरव्दारे आपले मन आणि शरीर स्वस्थ ठेवणारा विशेष कार्यक्रम सादर केला.

दरम्यान, दुपारच्या सत्रात मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी या महोत्सवास सदिच्छा भेट दिली. शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, उपजिल्हाप्रमुख मंगेश रानवडे सोबत होते.

यानंतर खेळ पैठणीचा हा महिलांसाठीचा लोकप्रिय कार्यक्रम झाला. यामध्ये विजेत्या चार महिलांना पैठणीची विशेष भेट देण्यात आली. त्याचप्रमाणे महिलांसाठी गीत, संगीत, गायन, नृत्य, महाराष्ट्राची लोकसंस्कृती हा बहारदार कार्यक्रम सादर झाला. यात उपस्थित महिलांनाही सहभागी होऊन गाण्याच्या तालावर ठेका धरला.

# पैशाचा पाऊस पाडण्याचा अघोरी प्रकार

## पेणमधील नाडे गावातील घटना, दोघांना अटक

**पेण : प्रतिनिधी**

झटपट श्रीमंत होण्याच्या हेतूने पैशाचा पाऊस पाडण्याचा अघोरी व खुळचट प्रकार पेण तालुक्यातील नाडे गावात ग्रामस्थांनी उजेडात आणला. या प्रकरणी त्यांनी दोघांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

काळोख्या रात्रीत स्मशानभूमीत काय चालले आहे हे नाडे ग्रामस्थांनी जाऊन पाहिल्यावर काही जण तिथे नारळ, लिंबू, टाचणी, खिळे, हळद, अबीर गुलाल, वस्त्र तसेच मानवी कवटी ठेवून तंत्रमंत्राचा अघोरी प्रकार करीत होते. याबाबत ग्रामस्थांनी विचारले असता त्यांनी स्मशानभूमीतून पळण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांनी त्यांचा पाठलाग करून यातील दोघांना पकडले आणि पोलिसांना खबर देऊन त्यांच्या ताब्यात दिले. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे स्मशानभूमीत सुरू असलेली अघोरी धडपड हाणून पडली.



या वेळी पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप बागुल यांनी नाडे आदिवासीवाडीवर जाऊन स्मशानभूमी परिसराची पाहणी केली. या वेळी त्यांना स्मशानभूमीत अघोरी विद्येसाठी लागणारे साहित्य व मानवी डोक्याची कवटी ठेवलेली आढळून आली. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.






# रोह्यातील इंद्रदेव धनगरवाडा आगीमुळे जळून खाक, तब्बल ४४ घरांना झळ

## खासदार सुनील तटकरे, धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रांताधिकाऱ्यांकडून घेतली माहिती



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील इंदरदेव धनगरवाडी येथे गुरुवारी सायंकाळी लागलेल्या वणव्यामुळे ४४ घरे जळून खाक झाली आहेत.येथील परिसर बेचिराख झाल्याचे चित्र या ठिकाणी दिसत आहे .सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही मात्र या वण व्यामध्ये घरांचे व वनसंपदाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे .

या घटनेची माहिती मिळतातच रोहाचे प्रांत ज्ञानेश्वर खुटवड व तहसीलदार किशोर देशमुख यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत .

मार्च महिना सुरू होताच तालुक्यात अनेक ठिकाणी वणव्याचे सत्र सुरू आहे. त्यामुळे संपूर्ण वनसंपदा धोक्यात आलेली आहे . गुरुवारी सायंकाळी पाच वाजता अचानक आग लागली यामध्ये इंद्रदेव धनगरवाडी येथील घरे भक्ष स्थानी ठरली सार्यांच्या संसाराची राख रांगोळी झालेली आहे . वणवा नियंत्रणासाठी अग्निशामक दल, एसव्हिआरयस टिम, एस एम टियम या विभागाने शर्तीचे प्रयत्न करून आज आटोक्यात आणली. या घटनेची माहिती मिळतात प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, रोहा तहसीलदार किशोर देशमुख, तलाठी, ग्रामसेवक व सामाजिक कार्यकर्ते यांनी नागरिकांची भेट देऊन त्यांना धीर दिला .

> इंद्रदेव धनगरवाडी येथील वणव्यामुळे ४४ घरे जळाली आहेत. त्या घरांचा पंचनामा केलेला आहे. लवकरच अहवाल सादर करून घरे बांधण्यासाठी अनुदानाची मागणी केली जाईल तसेच घटनेबद्दल माहिती घेण्यासाठी रायगडचे खा. सुनिल तटकरे, खा. धैर्यशील पाटील, आ.रविशेठ पाटील, आ.प्रशांत ठाकूर यासह सर्व आमदार तसेच महादेव जानकर यांनी फोनवरून चौकशी केली आहे
>
> – ज्ञानेश्वर खुटवड, प्रांत अधिकारी, रोहा

इंद्रदेव धनगरवाडी येथील झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे मात्र माझ्या रोह्या तालुक्यातील बांधवांना लवकरच प्रशासनाने न्याय मिळवून द्यावा व त्यांना लवकरात लवकर पक्की घरे बांधून द्यावी . तसेच येथील रस्त्याबाबत वनविभागाची अडचण असल्यामुळे रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे . रस्ता असता तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती तो देखील प्रश्न प्रशासनाने लवकरात लवकर सोडावा अशी मागणी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांनी केली आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी पत्रकारांनाही सोबत घ्या –मंत्री आदिती तटकरे



## अलिबाग प्रेस असोसिएशनमार्फत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलांना सक्षम करण्यासाठी शासनाबरोबर प्रशासन, पोलीस आणि पत्रकारांनी एकत्र येऊन काम करायला हवे, असे मत राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले. त्या अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या पुर्व संध्येला आयोजित तेजस्विनी पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होत्या. वेगवेगळ्या स्तरावर काम करणाऱ्या महिलांच्या कार्याची, योगदानाची दखल घेऊन, त्यांना सन्मानित करण्याता उपक्रम स्तुत्य असलल्याचेही त्यांनी म्हटले.

राजस्व सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्याला रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या प्रकल्पसंचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा महिती अधिकारी मनिषा पिंगळे अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर उपस्थित होते.

महावितरण विभागात कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचारी मोनिका औचटकर, कलाक्षेत्रातील आपली ओळख निर्माण करणाऱ्या अंकिता राऊत, क्रिडा क्षेत्रातील प्रियांका गुंजाळ, हळद लागवडीतून महिलांना सेंद्रीय शेतीचा मार्ग दाखवणाऱ्या मिनल राणे, तर आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या रुचिका शिर्के यांचा यावेळी तेजस्वीनी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षी अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने कर्तृत्ववान महिलांना तेजस्वीनी पुरस्कार दिला जातो. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असल्यापासून ते आतापर्यंत या पुरस्कार सोहळ्यात सहभागी होता आले आहे. तळागळातील कर्तृत्ववान महिलांना शोधून त्यांना उजेडामध्ये आणण्याचे काम तेजस्वीनी पुरस्काराच्या माध्यमातून अलिबाग प्रेस असोसिएशन करीत आहे. या पुरस्कारातून आपल्या समाजातील गावातील, शहरातील व आजूबाजूला असलेल्या महिलांना एक प्रेरणा देण्याचे काम पुरस्कार प्राप्त महिला करीत आहेत असे आदिती तटकरे म्हणाल्या

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अलिबाग प्रेस असोसिएशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेच्या वतीने गेल्या १८ वर्षात हा पुरस्कार मिळालेल्या महिलांवर एक पुस्तक प्रकाशित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या पुस्तकामुळे आगामी काळात जिल्ह्यातील महिलांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. आजच्या महिला या सक्षम आहेत, त्यांच्या हाती पाळण्याची दोरी आहेच पण घरातील तिजोरीची चावाही महिलांच्या हाती आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वयंपुर्णता येत आहे. महिला भगिनी वेगवेगळ्या क्षेत्रात चांगले काम करत आहेत. आणि अलिबाग प्रेस असोसिएशन त्यांच्या कामावर तटस्थपण लक्ष ठेऊन त्याची दखल घेत आहेत. हे काम कौतुकास्पद आहे असेही जिल्हाधिकारी यांनी म्हटले.

ग्रामीण भागात अनेक महिला प्रसिध्दी पासून दूर राहून आपले काम करत राहतात. त्यांना शोधून सन्मानित करण्याचे काम अलिबाग प्रेस असोसिएशनच्या माध्यमातून केले जाते. या पुरस्कारामुळे चांगले काम करणाऱ्या महिलांचा सन्मान होतोच, पण त्याच वेळी इतर महिलांनाही चांगले काम करण्याची प्रेरणा मिळत असते असे मत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी व्यक्त केले.

राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी विवीध योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात १९ हजार महिला बचत गटांना ४६० कोटी रुपयांचा कर्ज उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे ग्रामिण भागात महिलांच्या अर्थसाक्षरतेला वाव मिळाला आहे. जिल्ह्यात ४५ हजार ६०० लखपती दिदी झाल्या असल्याचे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांनी सांगितले. जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा विभागाच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांनी या वेळी उपस्थितांना संबोधित केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रास्ताविक अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रफुल्ल पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार समीर मालोदे यांनी व्यक्त केले.

# माणगाव राष्ट्रवादी काँग्रेसकडून १४६६ आदिवासी कुटुंबांना सौर कंदील वाटप

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसपक्षा कडून माणगांव तालुक्यातील १९ ग्रामपंचायती मध्ये १४६६ आदिवासी कुटूंबाना शुक्रवार दि. ७ मार्च रोजी माणगांव कुणबी भवन येथे सौर कंदील वाटप करण्यात आले.



यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी बोलताना सांगितले की, भविष्यासाठी या सर्व परिसरात मला ज्या ज्या वेळी संधी उपलब्ध होईल त्यावेळी आदिवासी बांधव,आठरा पकड जाती, बारा बलुतेदार आणि बहुजन समाजाचा या योजनां मध्ये समावेश होईल, सर्वधर्मियाचा कसा समावेश होईल व या सर्वांना लाभ होऊ शकेल अशा अनेक योजना मी आणण्यासाठी प्रयत्न करेन असे सांगितले.

यावेळी आदिवासी समाजाकडून खासदार तटकरे यांना घोगंडी तसेच क्रांतीवीर नाग्या महादू कातकरी यांची प्रतीमा भेट देण्यात आली. व्यासपीठावर रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,उपाध्यक्ष शेखर देशमुख,माणगांव तालुका अध्यक्ष काका नवगणे,जिल्हा चिटणीस उदय अधिकारी,संगीता बक्कम, सायली दळवी,शैलेश भोनकर,श्रध्दां यादव,बाळा खातू तसेच बहुसंख्यने अदिवासी बांधव उपस्थित होते.

# अलिबागेत मद्यधुंद पर्यटक महिलेचा धुडगूस

### बेदरकारपणे कार चालवून अनेक वाहनांना ठोकरले

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुण्याहून आलेल्या पर्यटकांनी गुरुवारी (दि.६) दुपारी अलिबागमध्ये धुडगूस घातल्याचा प्रकार समोर आला आहे. अलिबाग शहरात मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे कार चालवून वाहनांना धडक दिली. त्यांनी पोलीस व स्थानिकांसोबत वाद घातल्याची माहिती देखील उपलब्ध झाली आहे. याप्रकरणी एका महिलेविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी दुपारच्या सुमारास कारने जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर असलेल्या रुग्णवाहिकांसह शहरातील काही वाहनांना धडक दिली. त्यानंतर पुढेही बेदरकारपणे वाहन चालवीत रेवदंडा बायपासजवळ एका वाहनाला जोरदार धडक दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यामध्ये वाहनांचे नुकसान झाले असून कोणतीही जीवीत हानी झालेली नाही. यात पर्यटक महिला जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलीसांनी गाडीची तपासणी केली असता कारमध्ये काही दारुच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच पोलिसांशी देखील पर्यटकांनी हुज्जत घातली. मीना भोसले रा. पुणे असं या महिलेचे नाव असून तिच्यासह सोबत असलेल्या पुरूषाची वैद्यकीय चाचणी करण्यात आल्याची माहिती अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी दिली.

# रायगड जिल्हा पोलीस दलातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त मोटरसायकल रॅली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस तर्फे जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी (दि.७) महिला पोलिसांची मोटरसायकल रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला.

या वेळी रायगड पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक शिवतारे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.



# जागतिक महिला दिनानिमित्त जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना आज शुल्क माफ

**मुरुड : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिना दिवशी मुरुड तालुक्यातील राजपुरी ऐतिहासिक जंजिरा किल्ला, अलिबाग येथील कुलाबा किल्ला व रायगड किल्ला या ठिकाणी पुरातत्व विभागातर्फे पर्यटकांकडून आकारले जाणारे शुल्क माफ करण्यात आले आहे

सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला पहाण्यासाठी दरवर्षी सुमारे ७ लाख पर्यटक येत असता.यामध्ये दरवर्षी महाराष्ट्रातील विविध भागातील शालेय सहली मधून सुमारे दोन लाख विद्यार्थी या किल्ल्यास भेट देत असतात.देशी विदेशी पर्यटकांचा राबता येथे नेहमीच पहावयास मिळतो.



मुरुड तालुक्यातील येथील राजपुरी ऐतिहासिक जंजिरा किल्ला, अलिबाग येथील कुलाबा किल्ला व महाड येथील रायगड किल्ला या ठिकाणी पुरातत्व विभागातर्फे पर्यटकांकडून प्रवेश शुल्क २५ रुपये व विदेशी पर्यटकांना ३०० रुपये शुल्क आकारले जाते महिला दिनाचे औचित्य साधून त्याच दिवशी महिलांच्या सन्मानार्थ महिलांसह पुरुषांना आबाल वृद्धांना पुर्णतः शुल्क माफ असणार आहे अशी माहिती सहाय्यक संवर्धक पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.

पुरातत्व खात्याने महिला दिनाचे औचित्य साधून पर्यटकांसाठी खास योजना दिल्याने पर्यटकांच्या संख्येत नक्कीच वाढ होणार असुन याचा फायदा येणाऱ्या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यात शनिवार व रविवारची सुट्टी असल्याने या दिवशी जिल्ह्यातील गडकिल्लांवर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळणार आहे.

पान १ वरुन

## मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला राज्याच्या विकासाचा रोडमॅप

एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे मुख्यमंत्री कृषी वाहिनी. या प्रकल्पात कृषीचे फिडर वेगळे केले आहे. एकूण कृषीला १६ हजार मेगावॅट वीज द्यावी लागते. त्याची कॉस्ट आठ रुपये प्रति युनिट आहे, पण आपण शेतकऱ्यांकडून एक रुपया किंवा सव्वा रुपये युनिट घ्यायचो. सहा रुपये सबसिडी द्यायचो. आता डिस्ट्रीब्यूटर पद्धतीने फिडरचे सोलरायजेशन करण्यात येत आहे. त्यामुळे १६ हजार मेगावॅटचे काम सुरू झाले आहे. दोन हजार मेगावॅटचे काम झाले आहे. २०२६पर्यंत ही योजना मार्गी लागणार आहे. त्यामुळे जी वीज सात रुपयांना मिळायची ती आता तीन रुपयांना मिळणार आहे. त्यामुळे युनिटमागे पाच रुपये आपण वाचवणार आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. हे काम वेगाने सुरू आहे. शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसही वीज मिळणार आहे. वीज खरेदी खर्चात १० हजार कोटींची बचत होणार असून कार्बन उत्सर्जनात २५ टक्क्यांची कपात होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपण जी वीज वापरतो ती अपारंपरिक स्त्रोतून आणायची आहे. २०३०पर्यंत जे प्रकल्प पूर्ण होतील तेव्हा महाराष्ट्रात ५२ टक्के अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतातून मिळणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना आपण सुरू केली आहे. मागच्या एका वर्षात पावणे तीन लाख सौर कृषी पंप आपण स्थापन केले आहेत. प्रती दिवशी आपण एक पंप लावत आहोत. आपण आता हा दर दीड हजारावर नेणार आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## आगीच्या घटनांवर होणार प्रतिबंधक उपाययोजना

इमारतींच्या यंत्रणेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित इमारतीचे मालक/भोगवटादार/आस्थापना/व्यवस्थापन/गृहनिर्माण संस्था यांना महाराष्ट्र अग्नी प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियम २००६नुसार कलम ६ व नियम ९(।) अन्वये नोटीस बजावण्यात येते. मर्यादित विहित कालावधीमध्ये पूर्तता न केल्यास संबधितांवर आरोपपत्र दाखल करण्यात येऊन प्रकरण मा. मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयात दाखल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अभियोग दाखल केला जातो. सन २०१५ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र अग्नी प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार २७०० नोटिसी बजावण्यात आल्या असून ६४ प्रकरणी अभियोग दाखल करण्यात आला आहे, असे उत्तरात म्हटले होते. या उत्तराच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपाययोजना करण्याच्या दृष्टिकोनातून या विषयावर सभागृहाचे लक्ष वेधले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना म्हटले की, सन २०२३ साली ५०७४ आणि २०२४ साली ५३०१ आगींची संख्या आहे. २७०० इमारतींना नोटिसी बजावल्या आहेत म्हणजे २७०० नोटिसींच्या व्यतिरिक्त अन्य सर्व इमारती सुरक्षित आहेत असे प्रशासनाचे म्हणणे आहे का? असा सवाल उपस्थित करून तसे नसेल तर त्या संदर्भामध्ये प्रशासन काय कारवाई करीत आहे अशीही विचारणा करत आमदार अमित साटम यांनी सुचवल्याप्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स लिंक करा, असेही त्यांनी नमूद केले. लोकांच्या जीवाशी खेळ नको. त्यासाठी इमारती फायर ऑडिट करत नसतील तर त्यांना हेवी पेनल्टी लावा आणि हेवी पेनल्टी लावूनदेखील सोसायटी, संस्था पूर्तता करत नसेल तर त्यांचा पाणी, वीज जोडणी खंडित करणे यासारख्या उपाययोजना केल्या तरच ऑडिट होईल आणि लोकांचे जीव वाचतील. त्यासाठी शासनाने योग्य निर्णय घ्यावा, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आग्रही मागणी करत या विषयावर सभागृहाचे लक्ष केंद्रित केले.

आगीच्या दुर्दैवी घटनांवर आळा घालण्यासाठी इमारतींचे अग्निशमन लेखापरीक्षण (फायर ऑडीट) त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अग्निसुरक्षा नियमांचे पालन करणे, स्वयंचलित अग्निशमन यंत्रणा बंधनकारक करणे, नियमित तपासणी करणे आणि उल्लंघन केलेल्या इमारतींवर कारवाई करण्याबाबत शासनाच्या माध्यमातून योग्य कार्यवाही झाली पाहिजे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले.

यावर सभागृहात उत्तर देताना मंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियमात योग्य ती सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू असून त्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांचा समावेश केला जाणार आहे. फायर ऑडिट न करणाऱ्या इमारती व त्या संस्थांना जास्तीत जास्त दंड आकारले तरच या दोन वर्षातील इमारतींचे फायर ऑडिट होईल. त्यामुळे तशी कार्यवाही करण्यात येईल, असे ना. मिसाळ यांनी नमूद करत फायर ऑडिट नसलेल्या इमारतींना २७०० नोटिसी बजावल्या आहेत. त्यानंतर ज्यांनी पूर्तता केली त्यांच्यावर कारवाई केली नाही, पण ज्यांनी पूर्तता केली नाही अशी ६७ खटले दाखल करण्यात आल्याची माहिती देत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे नमूद केले.

# मुरुड पालिकेतर्फे महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त मुरुड नगरपरिषद सभागृहात मुंबई –परळ येथील महात्मा गांधी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ –डॉ. लीना पेडणेकर यांच लहान मुलांच्या आहारा संदर्भात व महिलांच्या आरोग्या व आहार संदर्भात मार्गदर्शन शिबिराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. सदरचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.लहान मुलांचे उपचार योग्य पद्धतीने होणे खूप आवश्यक आहे. त्यांचा आहार सुद्धा मर्यादित व पौष्टिक असणे क्रमप्राप्त आहे.लहान बालकांच्या मातांना याची विशेष करून माहिती मिळावी यासाठी सदरचा कार्यक्रम मुरुड नगपरिषदेकडून ठेवण्यात आल्याची माहिती महिला बालकल्याण समिती सदस्य –दिप्ती एरंडे यांनी दिली आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून संरक्षण भिंतीची उभारणी

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वावंजेत भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वावंजे गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून करण्यात येणाऱ्या संरक्षण भिंतीच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ७) झाले.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासाची मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या १५ लाख रुपयांच्या आमदार निधीतून वावंजे गावातील कब्रस्तानला संरक्षण भिंत बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



भूमिपूजन समारंभाला भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, वावंजे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, अंकुश पाटील, मोहम्मद अमीन शेख, यासीन शेख, रशीद शेख, गनी शेख, अन्वर शेख, नदीम शेख, इरफान शेख, अरबाज शेख, सोयल शेख, नौमान शेख, नवाज शेख, अभिषेक शर्मा, निलेश म्हात्रे, रमाकांत चोरमेकर, अरुण थले, युवा मोर्चा वावंजे पंचायत समिती अध्यक्ष निलेश दाढावकर, ग्रामीण मंडल चिटणीस सचिन पाटील, बूथ १४ अध्यक्ष उल्हास पाटील, अल्पसंख्याक मोर्चाचे उत्तर रायगड चिटणीस नासीर शेख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# थकबाकीदारांच्या मालमत्तेवर मनापाची अटकावणी कारवाई

## एका दिवसात साडेचार कोटींची वसुली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणी मोहीमेस जोमाने सुरूवात केली आहे. आजच्या एका दिवसात तब्बल १२ मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनात महापालिकेच्यावतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरोधोत पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या विविध जप्ती व अटकावणी पथकाच्या माध्यमातून वेगाने कारवाई केली जात असून, दररोज कोटीच्या घरामध्ये मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा होत आहे.

मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवरती प्रत्येक विभागातील वसुली पथकाने कारवाई केली असून यामध्ये खारघरमधील भारती विद्यापीठ,



प्राईम मॉल, द पॅसिफिक अपार्टमेंट, कळंबोलीमधील बेस्ट रोडवेज कंपनी आणि तळोजामधील वेदान्त इंटरमिडीएट प्राइवेट लिमिटेड यांच्यासह १२ मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली आहे.

कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. अटकावणी कारवाई अधिक तीव्र केल्यामुळे मालमत्ता कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचा कल वाढू लागला आहे. आजच्या एका दिवसात महापालिकेच्या तिजोरीत ४ कोटी ६६ लाखाची भर पडली आहे. तर या आर्थिक वर्षात एकुण ३४७ कोटी ८२ लाखाची वसुली करण्यात आली आहे.

**नागरिकांनी लवकरात लकवर आपला मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करून जप्ती सारखी कटू कारवाई टाळावी असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.**

**–स्वरूप खारगे, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

# कर्तृत्ववान डॉक्टर महिलांचा पत्रकार विकास मंचकडून सत्कार



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने शुक्रवार (दि. ७) रोजी जागतिक महिला दिनाच्या पूर्वदिनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णसेवा देणार्या कर्तृत्ववान महिला डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.तसेच प्राणिक हिलिंग प्रणालीच्या माध्यमातून रुग्णसेवा देणार्या कर्तुत्ववान महिलांना देखील यावेळी सन्मानित करण्यात आले. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा समजून समर्पण भावनेतून समाजसेवा करणार्या कर्तुत्ववान महिला डॉक्टरांना यावेळी शाल,श्रीफळ, सन्मानपत्र पुष्पगुच्छ आणि श्रीमद् भगवद्गीतेची प्रत देऊन सन्मानित करण्यात आले.

सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणारी पत्रकारांची नोंदणीकृत संस्था म्हणून पनवेल तालुका पत्रकार विकास मंच प्रचलित आहे.` दुर्गम क्षेत्रातील विविध जिल्हा परिषद शाळांच्यातून शैक्षणिक साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, असे समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने वैद्यकीय क्षेत्रामध्ये अतुल्य योगदान देणार्या डॉ. जयश्री पाटील,डॉ. समिधा गांधी, डॉ. विशाखा म्हात्रे, डॉ. कांचन पाटील वडगावकर, डॉ मानदा पंडित यांना सन्मानित करण्यात आले.तर प्राणिक हिलिंग या प्रणालीच्या माध्यमातून रुग्णसेवा देणार्या अर्चना पाटील आणि मेघना कदम यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉक्टर जयश्री पाटील म्हणाल्या की आज स्त्रीने स्वतःची प्रकृती सुदृढ ठेवणे जितकं महत्त्वाचं आहे तितकंच महत्व तिने आपल्या सुरक्षेला देखील दिले पाहिजे. भारतीय न्याय संहितेच्या ४९८ कलमाच्या अनुषंगाने प्रत्येक स्त्रीने आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या कायद्याचे अध्ययन केले पाहिजे. त्या म्हणाल्या की पनवेल तालुका पत्रकार विकास मंच नेहमीच आगळे वेगळे उपक्रम राबवत असतो. हृद्य सत्कार केल्याबद्दल त्यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे मनःपूर्वक आभार मानले. तर मेघना कदम यांनी प्राणिक हिलींग बाबत उपस्थितांना अवगत केले. तसेच स्पर्श आणि औषध विरहित ही उपचार पद्धती काळाची गरज असल्याचे सांगितले.

या वेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, दत्तात्रय कुलकर्णी,राजू गाडे,सुनील राठोड,वैभव लबडे आदी सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

# २०३०पर्यंत ५०० दशलक्ष लोकांमध्ये श्रवणशक्ती कमी होण्याची शक्यता; जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

## *जागतिक श्रवण दिनानिमित्त बहिरेपणा आणि कॉक्लियर इम्प्लांटसंबंधी जनजागृती*

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षी जगभरात जागतिक श्रवण दिवस साजरा केला जातो. यानिमित्ताने मेडिकवर हॉस्पिटलने लहान मुलांमधील बहिरेपणा आणि कॉक्लियर इम्प्लांटवर जनजागृती करणार्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लहान मुलांमधील श्रवण क्षमता कमी होण्याच्या वाढत्या घटनांमुळे, या कार्यक्रमात श्रवण क्षमता कमी होण्याच्या घटना रोखण्यासाठी वेळेवर उपचार करण्याचा सल्ला देण्यात आला.

याठिकाणी आयोजित उपक्रमात नवी मुंबई–इंडियन असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक्सच्या अध्यक्षा डॉ. मंगाई सिन्हा यांच्यासह इतर ऑडिओलॉजिस्ट, नर्सिंग स्टाफ आणि रोटरी सदस्य असे सुमारे



५० व्यक्तींन सहभाग नोंदविला. त्यांच्याकरिता याठिकाणी शैक्षणिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांमधील श्रवणक्षमता कमी होणे, त्याचे परिणाम आणि प्रगत उपचार पर्यायांबद्दल त्यांना शिक्षित करणे हा या उपक्रमाचा मुळ उद्देश होता.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०३० पर्यंत, ५०० दशलक्षाहून अधिक लोकांमध्ये श्रवणक्षमता कमी होण्याची शक्यता आहे यासाठी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. श्रवणशक्ती कमी होणे यास अनेक घटक कारणीभूत ठरतात. दिर्घकाळासाठी मोठ्या आवाजात वावरणे, कानाचे पडदे फाटणे, संसर्ग, कानात मेण जमा होणे, अनुवांशिकता, वृद्धत्व तसेच ओटोस्क्लेरोसिस, मधल्या कानाचा आजार आणि डोक्याला दुखापत यासारख्या काही वैद्यकीय परिस्थितींचा समावेश आहे.

परंतु लहान वयातील बहिरेपणा हा एक चिंतेचा विषय ठरत आहे. मेडिकवर हॉस्पिटल प्रतिबंधात्मक उपाय आणि सहभागासाठी कॉक्लियर इम्प्लांट आणि प्रगत ऑडिओलॉजी केअर व आधुनिक उपचारांवर प्रकाश टाकण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला सांगतात की, १००० पैकी अंदाजे ३ ते ६ मुले जन्मतःच बहिरेपणासारख्या समस्येने पिडीत असतात. यामुळे संवादात अडथळे निर्माण होऊन त्यांना संभाषण साधता न येणे,बोलणे न समजणे आणि दैनंदिन कामांमध्ये सहभागी होणे देखील कठीण होते. कालांतराने, यामुळे सामाजिक अलगाव निर्माण होऊ शकतो, कारण निराशेमुळे किंवा लज्जेमुळे अशा व्यक्ती संवादांपासून दूर जाऊ शकतात.

ऐकू न येणारी मुले बोलायला शिकणार नाहीत आणि ते बहिरेपणाबरोबरच आणि मूक्याचेही शिकारी ठरतात. ते अपंग होतात आणि त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर त्यांना असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यांना शिकण्याच्या आणि कमाईच्या समान संधी मिळत नाहीत. वेळीच निदान आणि वैद्यकीय उपचार ही गुंतागुंत रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. जन्माच्या वेळी ओएई चाचणी आणि गरज पडल्यास बेरा चाचणी करुन श्रवण क्षमता तपासता येते आणि कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेद्वारे पुढील उपचारांमध्ये याची मदत होते.

# १६ लाखांचे अमली पदार्थ जप्त

**पनवेल : वार्ताहर**

उलवा येथील बामनडोंगरी रेल्वेस्थानकाच्या वाहनतळामध्ये बुधवारी रात्री साडेअकरा वाजता संशयास्पद हालचाली करणार्या एका तरुणाला अटक केली. या तरुणाकडून १६,७५ हजार रुपयांचे अमली पदार्थ आणि मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

अमली पदार्थाच्या विकीसाठी एक तरुण बामनडोंगरी रेल्वेस्थानकाजवळ येण्याची बातमी उलवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अर्जुन रजाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक सुरेश खरात आणि पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील शेळके यांच्या पोलीस पथकाला समजल्यावर सापळा रचला. पोलिसांनी संतोष गोड्याळ या ३२ वर्षीय तरुणाला अटक केली.

# सील केलेल्या दगडखाणीत चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या तहसीलदारांनी वळवली गावाजवळील अवैध दगडखाणीवर सील ठोकून कारवाई केली होती. परंतु दगडखाण चालकांनी सील काढून दोन वाहने आणि उत्खनन केलेला मुद्देमाल चोरुन नेल्या बद्दल महसूल विभागाचे तलाठी राजेंद्र सावंत यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार वळवली गावाजवळील दगडखाणीत हा प्रकार घडला. महसूल विभागाने दगडखान चालकांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. पोलीस उपनिरिक्षक सोमनाथ मदने या प्रकरणी तपास करीत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात उद्या मार्गदर्शन सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी करिअरविषयक मार्गदर्शन सत्र रविवारी (दि. ९) सकाळी १० वाजता संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

महाविद्यालयात प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर व रोजगारविषयक वेगवेगळे उपक्रम राबविले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून हे करिअरविषयक मार्गदर्शन सत्र होणार आहे. या वेळी इयत्ता बारावी आणि पदवीनंतरच्या करिअरच्या संधी या विषयावर चाणक्य मंडल परिवार पुणेचे विश्वस्त आणि न्यूफ्लेक्स टॅलेंट सोल्युशन्सचे संचालक डॉ. भूषण केळकर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी संवाद साधणार आहेत.

# विरुपाक्ष मंदिरातील कीर्तन सप्ताहाची सांगता

**पनवेल : वार्ताहर**

येथील प्रसिद्ध विरुपाक्ष मंदिरामधे २४ वा नारदीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहाची सांगता रसायनी येथील ह. भ. प. सच्चिदानंद महाराज कांबेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

या सप्ताहात राज्यभरातील नामांकित कीर्तनकारांनी आपली सेवा सादर केली. यावेळी कीर्तनसेवेसाठी हरिपाठ ही संकल्पना ठरविण्यात आली होती. त्याला अनुसरून कीर्तनकारानी हरिपाठातील अभंगांवर निरुपण व कथाआख्यान सांगितले. नंदकुमार कर्वे यांनी ऑर्गनसाथ, गणेश घाणेकर यांनी तबलासाथ, हिमांशु मते व प्रशांत घरत यांनी मृदुंगसाथ आणि मुक्तानंद कांबेकर, निलेश म्हात्रे, गिरीधर मते यांनी गायनसाथ केली.

विरुपाक्ष मंदिर ट्रस्टच्या वतीने फाल्गुन शु. प्रतिपदेपासून नारदीय कीर्तनसप्ताहाचे



आयोजन करण्यात येते. यावर्षी नित्य हरिपाठ आणि नारदीय कीर्तनाबरोबरच वारकरी काल्याचे कीर्तन असा सुरेख संगम साधला गेला. भाविक श्रोत्यांचा लाभलेला भक्तिपूर्ण प्रतिसाद आमच्यासाठी आनंदनीय ठरला, असे मंदिर ट्रस्टचे सदिच संदीप लोंढे यांनी सांगितले.

# उरण येथे आज महिला दिनानिमित्त भव्य मेळावा

**उरण : वार्ताहर**

येथील उरण महिला संघ यांच्या वतीने जागतिक महिला दिन २०२५ व भव्य महिला मेळावा शनिवार (दि. ८) सायंकाळी ५ वाजता उरण नगरपरिषदेचे महाराष्ट्र भूषण डॉ .श्री नारायण विष्णू धर्माधिकारी कन्या शाळा क्र .१/२ पटांगण उरण पेन्शणर पार्क ,एन .एम .एम .टी बस स्टोप समोर येथे साजरा करण्यात येण्रार आहे.

.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे नीता महेश बालदी ,तर विशेष अतिथी उरण नगरपरिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे आहेत .सांकृतीक कार्यक्रमात नादब्रम्ह ,भक्ती गीत ,सूर उरण करांचा ,देश भक्ती गीत ,सी बर्ड स्पेशल स्कूल यांचे नृत्य साजरे केले जाणार आहेत

# उरण तालुक्यात मोकाट गुरे, जंगली वानरांमुळे पिकांची शेती धोक्यात!

## शेतकऱ्यांचे लाखो रुपयांच्या उत्पादनाचे नुकसान

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात मोकाट गुरे ढोरे आणि जंगली वानरे कडधान्याच्या पिकाची नासाडी करीत आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे उत्पन्न मिळणारा रब्बी हंगामी कडधान्य पिकांचा व खरीप हंगामातील भात पिकांचा पारंपरिक शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. यामुळे होणाऱ्या खरीप पिकाच्या शेतीची नुकसान भरपाई येथील शेतकऱ्यांना मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे.

रब्बी हंगामात लाखो रुपयांचे उत्पादन मिळवून देणाऱ्या कडधान्य पिकांच्या



संरक्षणासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी केली आहे.चिरनेर परिसरात श्री.महागणपती सेंद्रिय शेतकरी गटामार्फत गावात शेतकरी गट स्थापन करून शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळविले आहे.या विभागात अनेक अनेक नवनवीन प्रकल्प येत आहेत, मात्र त्या प्रकल्पाविषयी येथील शेतकऱ्यांना विश्वासात न घेता,हे प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न सुरु आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण,पनवेल व पेण तालुक्यातील १२५ गावांच्या शेतजमिनी संपादित करण्याचा सरकारचा डाव आहे.या पुढे येथील शेतकऱ्यांच्या जमिनीवर सोन्याची नगरी बनणार आहे.मात्र येथील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडी मोलाच्या भावात संपादित करण्याचा कुटील डाव शासन आखित आहे.

संपादकीय

# नारीशक्तीचा उत्सव!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिला सक्षमीकरणाविषयीच्या व्यापक सकारात्मक दृष्टिकोनामुळेच त्यांना आणि त्यांच्या भारतीय जनता पक्षाला महिलावर्गाकडून मोठ्या प्रमाणात मतदान होते. सरकारी पातळीवरून आज महिला सक्षमीकरणाकरिता अनेक स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांना आणखी बळ देण्याचा संकल्प आजच्या महिला दिनी करूया.

**दरवर्षीप्रमाणेच यंदाही आपल्याकडे आंतरराष्ट्रीय महिला दिवस जोमाने आणि उमेदीने साजरा होईल. देशभरातील असंख्य गावांमध्ये आणि शहरांमध्ये नारी शक्तीचा जयजयकार होईल. हे सारे महिला दिनाच्या उत्सवात अपेक्षितच आहे. परंतु वर्षातून एक दिवस महिलांचा सन्मान करायचा आणि बाकीचे ३६४ दिवस स्त्री अत्याचारांच्या बातम्या वाचायच्या किंवा टीव्हीवर पहायच्या, ही विसंगती दुर्लक्ष करण्याजोगी नक्कीच नाही. भारतीय समाज स्त्रीला माता, देवता अशा अनेक रूपांमध्ये पाहतो. स्त्री प्रतिमेचे पूजन भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून केले गेले आहे. तथापि, घराघरातील या लक्ष्मीला एरव्ही कसे वागवले जाते हेही आपण पाहतोच. भारतीय समाजातील हा विरोधाभास ज्या दिवशी नष्ट होईल तो खरा महिला दिन असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकरा वर्षांपूर्वी देशाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतली तेव्हापासूनच हा विरोधाभास नष्ट करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ही घोषणा त्याच धोरणाला अनुसरून होती किंवा मोदी सरकारच्या महिला सक्षमीकरणाच्या व्यापक कार्यक्रमाचा एक भाग होती. गावोगाव घरची लक्ष्मी चुलीपुढे धूर खात रांधत बसलेली असे. अशा भगिनींसाठी पंतप्रधान मोदी यांनी उज्ज्वला योजना आणली. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. पंतप्रधान मोदी यांच्यामुळेच महिलांना लष्कराचे दरवाजे उघडले. भारतीय रणरागिणी लढाऊ विमाने उडवू लागली. कित्येक स्त्रिया पोलिस दलात भरती होऊ लागल्या. आता तर दुर्गम बर्फाळ सरहद्दीवरही फौजी स्त्रिया देशाचे रक्षण करीत आहेत. मोदी सरकारच्या काळातील देशाच्या सर्वच अंतराळ मोहिमांमध्येही महिला शास्त्रज्ञ आपल्या बुद्धीची चमक दाखवत आहेत. मोठमोठाल्या कंपन्यांचे नेतृत्वही महिला समर्थपणे करत आहेत. गेल्या वर्षी नव्या संसद भवनाचे उद्घाटन झाल्यानंतर त्या अत्याधुनिक वास्तूमध्ये 'नारीशक्ती वंदन अधिनियमा'चे विधेयक मंजूर झाले. नव्या संसद भवनाचा हा शुभारंभ अद्वितीय असाच मानावा लागेल. गेल्याच महिन्यात झालेल्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही नारीशक्ती आणि महिला सक्षमीकरण यांनाच केंद्रस्थानी ठेवण्याचे औचित्यही पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी दाखवले होते. महिलांना सन्मानाचे जीवन मिळेल असे निर्णय घेण्यावर मोदी सरकारचा भर कायमच राहिला आहे. एकीकडे सरकारी पातळीवर धोरणांच्या केंद्रस्थानी महिलांना ठेवण्यात येत असल्यामुळे स्वाभाविकपणे त्याचे प्रतिबिंब खासगी क्षेत्रातही कमी अधिक प्रमाणात पडताना दिसते आहे. बचत गटांच्या महिला कायमच लोणची, पापड इत्यादी पदार्थ आणि तत्सम उत्पादने तयार करत आल्या आहेत. मात्र, आत्मविश्वासाने पुढे पाऊल टाकण्यास सज्ज झालेल्या महिला आता ही पारंपरिक चौकटही ओलांडताना दिसत आहेत. उदाहरणार्थ खाद्यपदार्थ वितरणाच्या क्षेत्रातही महिला बचत गट आपला ठसा उमटवू शकणार आहेत. यासाठी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मुंबई महापालिका आणि घरोघरी खाद्यपदार्थ पोहोचवणारी झोमॅटो कंपनी 'प्रोजेक्ट आर्या' हाती घेते आहे. महाराष्ट्रातील स्त्रिया गेली काही वर्षे निरनिराळ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवत आल्या आहेत. त्यांना नित्यनवी उंची गाठण्यासाठी आजच्या महिला दिनाच्या उत्सवातून आणखी बळ मिळो!**

# महिला सक्षमीकरण आणि देशाचा विकास

पुरुषाप्रमाणे स्त्रियांनादेखील तिचे नैसर्गिक अधिकार संविधानिक अधिकार वापरता येवेत ही भूमिका सर्वांची असते, पण मग प्रत्यक्षात ही विषमता का राहते? असा प्रश्न आपल्याला पडतो, तर त्याला कारण बहुतांशी परंपरेत आढळते.

शारीरिक बळ जास्त असल्याने समाज, समूह रक्षणाची जबाबदारी बहुतांशी पुरुषाकडे होती. बहुतांशी नेतृत्व पुरुषांचे असल्याने अनेक क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी होती, तर स्त्रिया या घरगुती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या घेत राहिल्या. पुरुषाला इतर क्षेत्रात सतत संधी मिळाली. सामाजिक भेदभाव असण्याचा व स्त्री पुरुष कामाच्या वर्गीकरणाचा वारसा जिथे जिथे आहे तिथे स्त्रिया या अन्य क्षेत्रात वंचित राहिल्या असल्याचे आढळते.

स्वच्छता, स्वयंपाक, बाल संगोपन, वृद्धांची काळजी घेणे, कुटुंबाची काळजी वाहणे यातच स्त्रियांनी विना वेतन समर्पण केल्याचे आढळते. निर्णय घेण्याची संधी न देणे किंवा स्त्रीला सुरक्षित ठेवण्यासाठी तिला घरातीलच कामे देणे किंवा मग मुल जन्माला घालण्याची नैसर्गिक जबाबदारी तिच्याकडे असल्याने अनायासेच तेच काम तिच्याकडे देणे या बाबी घडलेल्या आहेत. थोडक्यात फक्त कुटुंबाची जबाबदारी घ्यावी, तिचा बाहेरील जगाशी संबंध कमी असावा ही कुटुंबात भूमिका असल्याने तिला रांधा वाढा अन् उष्टी काढा यातच रहावे लागत असे.

अगदी १९व्या शतकापूर्वीची परिस्थिती बघितली तर स्त्रीलाच काय अस्पृश्य असलेल्यांनादेखील शिक्षण नव्हते. देशात जातीय व धार्मिक विषमता होती. स्त्रीला प्रवास, नोकरी व उद्योगधंदा करण्यास तसा मज्जावच होता. बाहेर कुठे कामाला जावे तर तिथे लैंगिक अत्याचार होण्याची भीती होती. त्यामुळेच भारतीय स्त्रिया या परंपरावादी आहेत असे आजही म्हटले जाते. आपण आज भारतात संविधानिक स्वातंत्र्य याची चर्चा करतो, पण त्या काळी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. अजूनही नवऱ्याला 'मालक' या नावाने संबोधले जाते.

इतिहासात कोणाचीही सत्ता असली तरी स्त्रियांचे अब्रू रक्षण यालाच अधिक महत्त्व दिले आहे. स्त्री ही भोग घेण्याचा विषय आहे असेही विलासी पुरुषांची मते होती. अनेक बारीक सारीक कामे सतत करूनही तिचे माणूस म्हणून मूल्य नव्हते. बायकांनी यात पडू नये असा पुरुष मंडळी यांचा सल्ला असे. विश्व कसे आहे, जग कसे आहे, कुठे कोणती माणसे राहतात याबद्दल काही कळण्याची सोय नव्हती. राजे बदलायचे, त्यांच्या मेहेरबानी खाली राहायचे असा दंडकच झाला होता. याशिवाय रूढींनीदेखील नेहमीच स्त्रियांना दुय्यम ठेवले. त्यांच्या इच्छा, आकांक्षा यांना महत्व दिले नाही. घर आणि जात आणि समाज सांगेल तो धर्म हेच संस्कार पालन म्हणजे शिक्षण हा शिरस्ता झाला. आज २०० वर्षे उलटून गेली तरी स्त्री सुरक्षा आम्ही करू शकलो नाही. निर्णय स्वातंत्र्य द्यायला मन धजवत नाही. विशेष म्हणजे धन असूनही पराधीन जीवन अशीदेखील परिस्थिती आपल्याला कुठे दिसते.



इंग्रजी राजवटीत जसजसे स्त्रियांना शिक्षण मिळत गेले तसतसे जग कसे आहे कळू लागले. प्रथम अक्षरे आली... वाक्ये आली... वाक्यातून आशय कळू लागला. शाळा–महाविद्यालये सुरु केल्याने आणि स्थानिक भाषेत हे ज्ञान दिल्याने समाज तुलना करू लागला आणि त्यातूनच रूढी परंपरेतील दांभिकता ध्यानी आली. वाचन, भाषण, लेखन, श्रवण यात नवे ज्ञान विज्ञान आले. सरकारी शाळा, समाजसुधारक यांच्या शाळा, वर्तमानपत्रे, यांनी जनजागृती केली. यातही सुरवातीला पुरुषच शिक्षण घेत होते, पण मुक्त विचारसरणी प्रभावाने अनेक स्त्रिया शिकू लागल्या. आपली दुःखे व्यक्त करू लागल्या. सावित्रीबाई, जोतीराव, फातिमा, राजा राममोहन रॉय, राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंग्रजी राजवटीतले सुधारणावादी, मानवतावादी अधिकारी यांनी स्त्रियांना शिक्षण मिळायला पाहिजे यासाठी काम केले. पारंपरिक समाजाला आधुनिक बनवले.

आता आज या काळात स्त्री–पुरुष दोन्ही माणसे असून दोघांची किंमत एकच आहे हे आता घटनेने मान्य केले आहे. सामाजिक व आर्थिक विषमता असलेल्या या देशात अनेक घटकांची कोंडी झाली आहे त्यात स्त्रियादेखील आहेत. पूर्वी संधी नाकारली गेल्याने त्या स्वतः विचारी होत नसत. एक प्रकारची मानसिक गुलामगिरी धर्माने त्यांना दिली, पण भारतीय संविधानाने त्यांना समानसंधी दिली. न्याय मिळविणारे पर्यावणासाठी सहाय्य केले. म्हणूनच स्त्रियांना शिक्षण घेण्याचा हक्क कळला. कायद्यातील तरतुदीचे भान आले. आपण स्वतः ज्ञानी होऊन कर्तबगार होऊन गरिबी हटवायची आहे हा संदेश दिला आहे. अलीकडे शेती, उद्योग, विज्ञान, संरक्षण, आणि राजकारण यामध्ये महिलांची संख्या वाढत आहे तसेच जागतिकीकरण झाल्याने नोकरी व व्यवसाय करण्यासाठी अनेक मुली परदेशात जात आहेत. तरीही समाजात अजूनही तिची सुरक्षितता नाही. बलात्कार घटना वाढल्या आहेत. शिकूनही अनेक स्त्रियांची आणि पुरुषांची या विषयी शासन प्रशासन यांच्याकडे साधे निवेदन देऊन आवाज उठवण्याची तयारी दिसत नाही. शिक्षण घेतले, पण त्याचा उपयोग भोवतालचे भय घालविण्यासाठी, गरिबी दूर करण्यासाठी, अनेकांना शिक्षण देण्यासाठी, अनेकांना प्रोत्साहन देण्यासाठी, वंचित असलेल्या सर्व घटकांना त्यांचे हक्क देवविण्यासाठी करायचा आहे. त्यासाठी संघटीत होऊन नित्यनेमाने माणूस घडवायचा आहे हे भान सुटले आहे. पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊनही अंतःकरणात भीती आहे, घर सोडावे वाटत नाही, प्रगती करण्याची महत्वाकांक्षा नाही, केवळ पद प्रतिष्ठा यांच्या लालसा पुरुषांनी दिल्या त्या हवेत पराधीन होत फुगे होऊन आकाशात फिरणे आणि शेवटी फुटणे हे काय आयुष्य आहे? स्वतः निर्माण केलेली दुःखे इतकी आहेत की समाजाचे काय करायचे साधा विचारही नाही. प्रतिमा हवी आहे, पण सखोल अभ्यास नको, जग बदलायचे आहे, पण घर सोडायला नको. बोलण्यात आणि संसार रडगाणी गाण्यात सामर्थ्य नाही, पण तिची अडवणूक तर आपणच करतो, परिणामी तिच्यातला पक्षी आकाशात झेप घेत नाही. यासाठी सावित्रीबाई यांची कृतीशील झुंज समजून घेण्याची आवश्यकता आहे. आज विचार करतो त्याला मूर्ख समजण्याचे उपद्व्याप सुरु आहेत ही व्यवस्था तशीच टिकून राहील हे काम मतलबी माणसे करतात. शासनाने वाटलेले पैसे घेऊन तात्पुरते अडचणी सुटतील, पण आर्थिक, मानसिक विकासाठी जाणीवेने हिंमत देण्याची आवश्यकता आहे. विकासाचा अर्थ सापेक्ष असतो. व्यक्ती काय चांगले उद्देश ठेवते आणि प्रयत्न करून इच्छा पूर्ण करते त्यावर तिची प्रगती होते.

सर्वांना मोफत उच्च शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, शेती याचे प्रशिक्षण, जागतिक पातळीवर मागणी असलेल्या कौशल्याचे प्रशिक्षण, दिल्याने रोजगारक्षम महिला तयार होतील. स्वतःच्या मालकीचे व्यवसाय सुरु करणे आणि त्याची भरभराट होईल असे प्रयत्न करणे, काम कुठेही करोत समान वेतन देणे, व्यवसाय करण्यास आवश्यक भांडवल पुरवणे, मानसिक धैर्य वाढेल असे वातावरण तयार करणे, सुरक्षित असण्याची जबाबदारी घेणे, महिलांना राजकीय क्षेत्रात संधी देणे, प्रशिक्षण देणे, विश्वासू नागरिक निर्माण करणे, कायदा, संविधान व लोकशाहीचे प्रशिक्षण देऊन जबाबदार नागरिक घडवणे, महिलांचे शिक्षण, नोकरी व व्यवसाय निर्भयपणे करता येईल असे वातावरण तयार करणे, त्यांना समानतेने वागवणे, त्यांचे स्वातंत्र्याचे अधिकार वापरण्यास त्यांना मुक्तता देणे हे सर्व करावे लागेल, त्याने विचारी आणि कर्तबगार महिला होतील. संधीच्या समानतेमुळे अनेकविध क्षेत्रात काम करून त्या उत्पादनात वाढ तर करतील, पण देशाला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करतील. संकुचित जीवन जगण्याने झालेला कोंडमारा नष्ट होऊन जीवनात आनंददायी मुक्त प्रवास करता येईल. मुलींचे शिक्षण झाले तर जातीभेद, अंधश्रद्धा, दांभिकता दूर होऊन समतेसाठी, बंधूतेसाठी, मानवतेसाठी मोठे काम होईल. सामाजिक विषमता व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी देशातील सर्व स्त्रियांना नागरिक म्हणून अधिकार उपभोगू देणे व त्यांनीही संधीचा फायदा घेऊन भरीव कामगिरी करून आपला व समाजाचा उत्कर्ष कसा करत आहोत हे दाखवून देण्याची गरज आहे. म्हणूनच महिलांचे या पद्धतीने सक्षमीकरण करत जाण्याने देशाचे भविष्य उज्ज्वल होईल.

महिला दिन म्हणजे भरीव कामगिरी करण्याचा निर्धार आणि त्यासाठी पद्धतशीरपणे पुढे जाण्यासाठी केलेले नियोजन आहे असे वाटते. स्त्री–पुरुष मैत्रभावना निर्माण होणारे आणि एकजुटीने संसार व देश घडविणारे शिक्षण व पर्यावरण आपल्याला हवे आहे.

**–प्रा. डॉ. सुभाष वाघमारे,**
प्रभारी संचालक, भाषा मंडळ, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा




जागतिक महिला दिन! हा दिवस म्हणजे स्त्री शक्तीचा गौरव करण्याचा, तिच्या कर्तृत्वाला सलाम करण्याचा दिवस आहे. अनादी काळापासून स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने आणि प्रेमाने जगाला नवी दिशा दिली आहे. आज आपण राजमाता जिजाऊ, कल्पना चावला, मदर टेरेसा, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या कर्तृत्ववान महिलांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. त्यांनी आपल्या कार्यांनी समाजात मोलाचे योगदान दिले आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत.

महिला म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती करुणा आणि प्रेमाचा झरा आहे. आजच्या काळात महिलांनी आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढत आहे. ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन महिलांच्या शक्तीच्या कार्याचा जागर करण्यासाठी हा दिवस असतो. हा दिवस लिंग समानता, हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. महिलांचा हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. या दिवशी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. महिलावर्गाला त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

स्त्री म्हणजे वासल्य, स्त्री म्हणजे मांगल्य, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कतृत्व, स्त्री म्हणजे प्रत्येक क्षणाची साथ, स्त्री म्हणजे प्रत्येक अडथळ्यावर मात करणारी माता... महिला अनेक क्षेत्रात प्रगती करत आहेत.अगदी कृषी क्षेत्रापासून अंतराळ क्षेत्रापर्यंत महिला आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहेत, पण दुसरीकडे ग्रामीण भागात आणि निमशहरी भागातील महिलांना रोज अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी राज्य शासनामार्फत अनेक योजना राबवल्या जात आहेत. मुलींच्या जन्मापासून ते शिक्षण आणि विवाहानंतरही अनेक योजनांचा लाभ घेता येतो. दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या महिला दिनानिमित्त आपण केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने खास महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी जाणून घेणार आहे.

महिलांसाठी शासकीय योजना अशा आहेत. महिला समृद्धी योजना, महिला उद्योग निधी योजना, महिला कॉयर योजना, जननी सुरक्षा योजना, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना, लेक लाडकी योजना, स्वर्णिमा योजना, महिला सन्मान योजना इ.योजना शासनाकडून महिलांसाठी राबविण्यात येत असून महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी राज्य शासनामार्फत अनेक योजना



राबवल्या जात आहेत.

मुलींच्या जन्मापासून ते शिक्षण आणि विवाहानंतरही अनेक योजनांचा लाभ घेता येतो. बेटी बचाओ, बेटी पढाओ स्त्री–भ्रूणहत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी ॲक्ट तयार लागू करण्यात आला आहे. स्त्रीचे कुठेही सामाजिक शोषण होऊ नये यासाठी हा केंद्रबिंदू मानून संरक्षण करण्यात येते.

दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या महिला दिनानिमित्त आपण केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने खास महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी जनजागृतीपर व्याख्यान, उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांच्या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येतो. सध्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना शासनातर्फे राबविण्यात येत आहे. त्याला सर्वत्र गरजू महिलांचा प्रतिसाद मिळत आहे. भारतासारख्या प्रगतीशील देशात महिलांनी राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, प्रधानमंत्री, अर्थमंत्री, मुख्यमंत्री तसेच शासकीय स्तरांवर,वैद्यकीय, विधी, संशोधन आदी क्षेत्रात महत्त्वाची पदे भूषविली असून कार्यरत आहेत. ३० टक्के नोकरीत ठिकाणी आरक्षण देऊन महिलांचा सन्मान करण्यात आला आहे.

प्रत्येक मानवाने स्त्रीच्या पोटी जन्म घेतला असून स्त्रीच्या आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, इ. शोषण कुठेही होऊ नये यासाठी शासनाने संरक्षणासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. यासाठी समाजाच्याही तेवढाच पाठिंब्याची गरज आहे. समाजात प्रत्येक स्त्री आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे. परिवाराच्या जबाबदारीचा हिस्सा बनू पाहात आहे. स्त्री ही आई ,बहिण ,पत्नी, मुलगी इ.असून सर्वच क्षेत्रात प्रगती करत आहे, पण आजही देशात शासकीय आकडेवारी नुसार माणसांच्या तुलनेने स्त्रीचे प्रमाण कमी आहे यासाठी स्त्री संरक्षण ही आपली सर्वांची सामाजिक जबाबदारी याचे पालन सर्वोतोपरी व्हावे, जेणेकरून स्त्रीच्या संरक्षणात आपण कुठेही कमी पडणार नाही, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. महिला म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती करुणा आणि प्रेमाचा झरा आहे.

आज ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे आर्थिक सामाजिक शोषण कुठेही होऊ नये, स्वबळावर–स्वसंरक्षणासाठी सक्षम होण्यासाठी समाजानेही पाठिंबा द्यावा, एवढीच अपेक्षा.

**–हेमकांत सोनार, अलिबाग**

# वीज ऊर्जा आणि स्त्री एनर्जी


अनेक स्त्रियांशी काही ना काही निमित्तानं बोलणं होतं... 'मी घरीच असते',' मी गृहिणी आहे' हे सांगताना अनेक जणींचा सूर निराशेचा असतो, आपण काहीच विशेष करत नाही असा न्यूनगंड असतो.

गृहीणी ईतरांच्या यशासाठी त्याग करते, कष्ट करते 'थँकलेस जॉब' करते, तीसुद्धा कष्ट करते म्हणून तिनं स्वतःला कमी लेखू नये... उर्जा खाते– महावितरणमध्ये मानव संसाधन विभागात काम करताना कार्यरत महिलांसह अनेक जण भेटले. बरेच दिवस मनात होतं 'सोलर एनर्जी'प्रमाणे 'फेमिनाईन एनर्जी' यावर एकदा लिहायचंच! अनमोल आहे स्त्रीच जीवन...

प्रत्येक शरीरात स्त्री ऊर्जा 'फेमिनाईन एनर्जी' असते. स्त्री शरीरात ती जास्त प्रमाणात असते. ही एनर्जी पालन पोषण करणारी, प्रेम आणि क्षमेते नं जोपासणारी एनर्जी आहे. ही ऊर्जा असणं हीच एक मोठी गोष्ट आहे. आकाशात सूर्य असतो तो दिवसभर काय करतो? तो फक्त असतो त्याच्या असण्यानंच 'सोलर एनर्जी' मुळे खूप काही होतं, तशी ही ऊर्जा 'असण्याची' ऊर्जा आहे.

ही एनर्जी घरात असल्यानं घरात स्नेह ओलावा, चैतन्य आहे, घरात उत्साह आहे, सौंदर्य आहे. तिनं काही करणं हे एक्स्ट्रा आहे, एनर्जीचा उपयोग करुन ती स्वयंपाक करते घर सजवते, पण कधी तिनं ही एनर्जी वापरून काही केलं नाही तरी तिची किंमत कमी होत नाही. ती एनर्जी घरात आहे आणि ते असणंच एक देणं आहे. घरासाठी वरदान आहे.

याचा अनुभव प्रत्येकाला आहे एखाद्या एकट्या रहाणा–या पुरुषाचं, बॅचलरच्या रुमचं उदाहरण घेऊ, तिथे गेल्यावर कसं वाटतं ते अनुभवा. तिथे काहीतरी उणिव वाटते ती कसली? तर 'फेमिनाईन एनर्जी' तिथं नाही किंवा घरातली आई/पत्नी बाहेरगावी गेली आणि घरात इतर कोणतीही स्त्री नसेल तर घरात कसं



वाटतं ते तपासा. दोन दिवस कदाचित बदल चांगला वाटेल, पण नंतर मात्र सगळी कामं करणारे सेवा देणारे असूनही काहीतरी रिकामं वाटेल, रुक्ष वाटेल ती उणिव आहे स्त्री एनर्जीची!

लग्न झाल्यावर लेक घर सोडून जाते तेव्हा घर रितं रिकामं होतं, ही ऊर्जा जाते, फक्त घरातली मुलगी नाही, ही ऊर्जापण तिच्यासोबत जाते. अगदी घरातलं लहान बाळ एखादी मुलगी असेल तर घरातलं वातावरण पहा आणि तिचं असणं म्हणजे काय ते फील करा. ती एनर्जी त्या नवजात मुलीतही आहे.

ही एनर्जी निसर्गाच्या निर्मितीची... क्रिएशनची ऊर्जा आहे, घरातली सगळी प्रगती, सगळ्यांचा विकास, सगळयांचं पुढे जाणं, यश मिळणे यासाठी स्त्री एनर्जीचे वितरण केले जाते.

मुलांच्या अभ्यासातल्या यशासाठी हिच घराघरातली सरस्वती आहे, नवऱ्याच्या आर्थिक यशाचं कारण हीच लक्ष्मी आहे.

घरातली प्रत्येक स्त्री काय देते? काय करते? तर ती असते ! तिचं असणंच देणं आहे, तिनं आणखी काही करायची गरजच नाही, (तरी ती खूप काही करतच रहाते.)

तिच्या असण्याचीच किंमत खूप आहे ती पैशात मोजता येत नाही, जिथं अनादर आणि अपमान होतो, तिच्या एनर्जीचं शोषण होतं तिथं ती नकारात्मक होते आणि सगळ्या घराला त्याचे परिणाम भोगावे लागतात. म्हणूनच आपल्या संस्कृतीत स्त्री ला देवी म्हणून पूजा करायला सांगितलंय, पूजा प्रतिकात्मक आहे, पूजा म्हणजे आदर आणि कदर करणे. आपल्या यशात आपल्या सुखात तिचा न दिसणारा वाटा मान्य करणे!

मला वाटतं प्रत्येक स्त्री ला आपल्या आतल्या या एनर्जीची खात्री पटली तर तिच्या मनातला अपराधीभाव आणि न्यूनगंड जाईल.वीजेसारखी ऊर्जा दिसत नाही पण असते 'सोलर एनर्जी' दिसत नाही, पण असते तसं स्त्रीच्या ऊर्जेवर घराचं घरपण टिकून असतं. तिच्या कामांमधून ऊर्जा अभिव्यक्त होते आणि त्यामुळे इतरांना पुढे जाता येतं.

कोणत्याही स्त्रीनं स्वतःची किंमत आपण नोकरी करतो की नाही, पैसा कमवतो की नाही या निकषावर करायची गरज नाही. अनुकूल परिस्थिती नसेल आणि स्त्रीला आयुष्यात ऋतूप्रमाणे कधी थांबावं लागलं तरी स्वतःला आळशी, निरूपयोगी समजू नका, कारण निसर्गाची प्रचंड ऊर्जा पेलून ईतरांना सहारा देत तुम्ही स्थिर उभ्या आहात... स्त्रीच असणं हीच एक मोठी उर्जा आहे

स्त्रीच घरात नुसतं बसणं नाही, तर घरात 'असणं' आहे जे अमूल्य आहे. ओळखा या शक्तिला आणि स्वाभिमानाने जगा...!

**–डॉ. स्मिता बडे–साळुंखे,**
वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं) महावितरण, प्रकाशगड, मुंबई

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# कोकणात शिमगोत्सवाची लगबग; गावकरी जमू लागले!



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील प्रत्येक गावात, फाल्गुन शुद्ध ५ या दिवशी शिमगो उत्सवाची धूम सुरु होते.शिमग्याच्या प्रारंभीच्या दिवशी, प्रत्येक घरात ' आमच्या दाराशी हाय शिमगा ' अशा गजरात गाणी वाजवली जातात. होळीच्या आगमनानंतर, प्रत्येक गावी शुद्ध विधी व प्रेमाने देवता किंवा देवीची पालखी जाते. या पालखीमधून देवता भक्तांना भेटायला, प्रेमाने आणि आशीर्वाद देण्यासाठी आलेले असतात. हा एक अत्यंत भावनिक क्षण असतो, जेव्हा प्रत्येक भक्त आपल्या हृदयातील गाऱ्हाणे देवतेला सांगतो, आणि त्यांच्याशी आपले इच्छाशक्ती व आकांक्षांचे वचन व्यक्त करतो.

देवता ही एका वर्षात एकदाच आपल्या भक्तांना भेटायला येते. म्हणूनच, शिमग्याचा सण उत्सव अत्यंत आनंदी आणि खास असतो. घराघरांत रंगांची उधळण, ढोल ताशांचा गजर, आणि पालखीच्या भोवती नाचणारे भक्त हा सण एक महत्त्वपूर्ण अनुभव बनवतो. शिमग्याच्या उत्सवात सर्व वयोगटातील, समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येतात आणि एकसारखा आनंद साजरा करतात.

शिमगा सणाचे महत्त्व हे त्याच्या समाजधर्मावर आणि त्याच्या सांस्कृतिक जडणघडणीवर आधारित आहे. म्हणूनच, कोकणातील प्रत्येक गावात उत्सवाच्या या क्षणी, एकत्र येऊन प्रार्थना केली जाते, भक्तांची इच्छा पूर्ण होण्याची आशा व्यक्त केली जाते आणि आपल्या कुटुंबाच्या समृद्धीच्या आकांक्षांमध्ये देवतेसाठी गाऱ्हाणे घालले जातात. पारंपारिक शिमग्याच्या पालखी व गजराच्या ध्वनीत प्रत्येक भक्ताला आनंद आणि भक्तिरसाचा अनुभव घेता येतो. होळीच्या दिवशी, पालखी आपापल्या गावी परत जात असताना, गावातील प्रत्येक मनुष्य आपल्या जीवनाचा धन्य अनुभव घेत असतो.

शिमगा सण कोकणाच्या सांस्कृतिक गाभ्यात जिवंत राहतो, जो त्याच्या अनोख्या उत्साहाने आणि परंपरेने एक स्थायी छाप कोकणवासीयांच्या हृदयावर ठेवतो.

# रेल्वेगाडीची ठोकर लागून वृद्धाचा मृत्यू

**मोहोपाडा** : रेल्वचा धक्का लागून वयोवृध्दाचा मृत्यू झाल्याची घटना रसायनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मौजे सारसई गावच्या हद्दीत साखऱ्या इक्या पवार (वय ६२) याला रेल्वेचा धक्का लागून रेल्वे पटरीवर जखमी होउन बाजूला पडलेला होता. याबाबत गणपत साखऱ्या पवार (रा. केळवणे, आदिवासी वाडी) याने रसायनी पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली असून जखमी साखऱ्या पवार याला औषधोपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई माळी व तपासिक अंमलदार पोहवा पवार अधिक तपास करीत आहेत.

# वाशिवली–इसांबा फाटा बससेवा बंद झाल्याने प्रवाशांची गैरसोय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात जाणारी इसांबेफाटा ते वाशिवली या पेण आगाराच्या एस.टी.च्या फेर्या लॉकडाऊनमुळे बंद केल्या होत्या. या एस.टी. गाड्या अद्याप सुरू केलेल्या नाहीत.त्यामुळे प्रचंड प्रमाणात प्रवाश्यांचे अतोनात हाल होत आहेत.

सकाळी ७.३० ची खोपोली लोहप मार्गे खोपोली, दुपारी १२.३० ची खोपोली वाशिवली मार्गे खोपोली दुपारी २.४५ वाजताची खोपोली–वाशिवली मार्गे खोपोली.या गाड्या बंद आहेत इंसाबाफाटा ते वाशिवली विभागाकडे जाणारी पूर्व नियोजीत दिवसातून तीनवेळा धावणारी एस.टी. बंद झाल्याने या विभागात जाणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे विशेषतः या विभागातून अनेक मोलमजूरी करणारे मजूरकर, कामगार, आणि महिला,विद्यार्थी वर्ग हा खोपोली व अन्य ठिकाणी जात असतात

रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव,इसांबे,माजगाव ग्रामपंचायत हद्दीतील शिवाय कुंभिवली अंतर्गत येणारी गावे सावरोली, धामणी खरसुंडी, खारपाडा या गावातील प्रवाशांची खूप गैरसोय होत आहे त्यामुळे बंद करण्यात आलेल्या एस.टी. बसेस पुन्हा सुरू करण्याची मागणी स्थानिक नागरिकांची होत आहे. याबाबतीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्जत व पेण येथील आगार प्रमुखांना वेळोवेळी निवेदने दिली आहेत.

# कन्यारत्नास जन्म देणाऱ्या मातेचे होणार कौतुक; महिला दिनानिमित्त उपक्रम

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने खोपोली विभागात जन्मास येणाऱ्या कन्या रत्नास जन्म देणाऱ्या मातेचे अभिनंदन व कौतुक उपक्रमाचे आयोजन दिनांक ०८ मार्च २०२५ पासून प्रारंभ होत आहे.

खोपोली हद्दीतील दवाखान्यात कन्या रत्नास जन्म देणाऱ्या मातेचा सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन अभिनंदन करण्यात येणार आहे.आई होणं हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो.महिलांच्या जीवनात आलेल्या या नव्या सुखासाठी मनः पूर्वक शुभेच्छा देताना मातृत्वाचा प्रत्येक क्षण आनंदाने आणि प्रेमाने भरलेला असो ही प्रार्थना देखील करण्यात येणार आहे.

आई होणं म्हणजे प्रेम,त्याग आणि आनंदाचं अनोखं मिश्रण असुन आयुष्यात आलेल्या या गोड कन्येसोबत प्रत्येक दिवस सुंदर आणि संस्मरणीय ठरो याचसोबत आई म्हणून आपल्या नव्या प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा देणारा हा उपक्रम समाजासाठी ऊर्जादायी ठरेलं.कन्येस जन्म देणाऱ्या माता व त्यांच्या कुटुंबियांचे अभिनंदन व बाळाला शुभाशीर्वाद देणारे पत्र व भेटवस्तु देऊन सदिच्छा देण्यात येतील.

## MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-68/23-24 RFX 7000035610 | Supply of all in one PC's at various s/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 9.53 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids up to 05.03.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 20.03.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
## SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -03/2025-26<br>**Name of Tender :** E-Tender for the Providing of 02 No.s of Skilled labours against vacant post of LDC (F&A) and UDC (F&A) & 02 No.s of unskilled labours against vacant post of Store Helper and Peon of Major Stores, Panvel for Financial Year 2025-26.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.-7000035637** | **Online Downloading the RFx :** Dt.08.03.2025, 00:00 Hrs. to 22.03.2025, 23:59Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 22.03.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx** : Dt. 24.03.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 24.03.2025at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :-
**https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: -The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note** : All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
**Executive Engineer, Major Stores, Panvel.**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे सारंग, ता–खालापूर, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन–**
**मौजे – सारंग, ता – खालापूर, जि–रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर. पॉ | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| सारंग | जुगदीपकुमार सेहगल | ३४ | ९ | ०.७५.८० | ५.१३ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दि.: ०८/०३/२०२५**

सही/–
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
पत्ता– शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर–५, नवीन पनवेल, ४१०२०६

## MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
## SRM E-TENDER NOTICE /2025-26

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following works.

| Sr. No. | RFx. No. | Tender No. | E-Tender No. & Description | Due Date & Time (Hrs.) for Submission & Opening of Tender | Tender Fee & EMD | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000035615 | Ten-01/ 2025-2026 | E-tender for Hiring of Swift Dzire or equivalent Car for Executive Engineer PAC Division Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026. | Download and submission of tender Documents Date Dt. 08.03.2025, 11:00 Hrs to Dt. 23.03.2025 ,23:59 Hrs **Technical Opening: -** Dt. 24.03.2025, 10: 00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt. 24.03.2025 at 11:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 2 | 7000035616 | Ten-02/ 2025-2026 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Protection unit 1 under PAC Division Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026. | Download and submission of tender Documents Date Dt. 08.03.2025, 11:00 Hrs to Dt. 23.03.2025 ,23:59 Hrs **Technical Opening: -** Dt. 24.03.2025, 10: 00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt. 24.03.2025 at 11:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 3 | 7000035618 | Ten-03/ 2025-2026 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Protection unit 2 under PAC Division Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026. | Download and submission of tender Documents Date Dt. 08.03.2025, 11:00 Hrs to Dt. 23.03.2025 ,23:59 Hrs **Technical Opening: -** Dt. 24.03.2025, 10: 00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt. 24.03.2025 at 11:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 4 | 7000035619 | Ten-04/ 2025-2026 | Hiring of A.C. XLYO or equivalent vehicle for Automation Unit under PAC Division Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026. | Download and submission of tender Documents Date Dt. 08.03.2025, 11:00 Hrs to Dt. 23.03.2025 ,23:59 Hrs **Technical Opening: -** Dt. 24.03.2025, 10: 00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt. 24.03.2025 at 11:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 5 | 7000035643 | Ten-05/ 2025-2026 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Communication Unit under PAC Division Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026. | Download and submission of tender Documents Date Dt. 08.03.2025, 11:00 Hrs to Dt. 23.03.2025 ,23:59 Hrs **Technical Opening: -** Dt. 24.03.2025, 10: 00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt. 24.03.2025 at 11:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |

Contact Person: -The Dy. Executive Engineer, Phone No. (022) 27457302

Sd/-
**Executive Engineer, PAC Division Panvel**

## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय–आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल– ४१०२०६ दुरध्वनी क्र– ०२२–२७४५८०४०/४१/४२
Email Id: panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.९५/९५/२०२५ दिनांकः–०७/०३/२०२५

| अ.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | पमपा/मातंवि/३०२४/ प्र.क्र.३१/८६/२०२५ | पनवेल महानगरपालिकेत संगणक व्यवस्थेकरीता सुरक्षा धोके वास्तवित वेळेत ओळखून विश्लेषण करून, अर्लट्स गोळा करणे, संभाव्य धोके ओळखणे आणि त्वरित प्रतिसाद देण्यासाठी एक सुसंगत सुरक्षा प्रणाली तयार करणेबाबत. (३ वर्षांकरीता) अंदाजपत्रक तयार करणेकरिता बाजारभाव मागवित आहेत. |
| २ | सदर कामाची माहिती, माहिती व तंत्रज्ञान विभागात उपल्बध आहे. | |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. ०८/३/२०२५ ते दि. १५/०३/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | e-Tender-04/25-26 /7000035571 | Hiring of LMV (e.g. Swift Dezire or likewise) with AC along with driver and fuel for Executive Engineer, 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane. | Rs. 5,58,560.33/- | 20.03.25 up to 23:59 hrs. |
| 2. | e-Tender-05/25-26 /7000035575 | Hiring of LMV (e.g. Mahindra bolero or Similar) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane. | Rs. 5,74,635.47/- | 20.03.25 up to 23:59 hrs. |
| 3. | e-Tender-06/25-26 /7000035577 | Hiring of MMV (i.e. Mahindra bolero camper or pickup or likewise) for movement of officers for supervision/ official work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division. | Rs. 5,99,976.95/- | 20.03.25 up to 23:59 hrs. |
| 4. | e-Tender-07/25-26 /7000035590 | Hiring of MMV (e.g. Mahindra bolero camper or pickup or likewise) towards 400 KV Line Main. Sub Division, Nagothane under 400 KV R.S Nagothane Division. | Rs. 5,99,903.91/- | 20.03.25 up to 23:59 hrs. |
| 5. | e-Tender-08/25-26 /7000035593 | Hiring of LMV (e.g. Eartiga or likewise) for school going children 7 seater from kansai colony to Nagothane at 400 kV Nagothane s/s under 400 KV R.S. Nagothane. | Rs. 5,87,368.66/- | 20.03.25 up to 23:59 hrs. |

**EMD Rs.** 1% of Estimate amount, Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|---|
| 1 | Tender-1 **(Rfx 7000035560)** | Hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,80,213/-** |
| 2 | Tender-2 **(Rfx. 7000035563)** | Hiring of vehicle at 220kV Uran Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 3 | Tender-3 **(Rfx 7000035562)** | Hiring of vehicle at 220kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 4 | Tender-4 **(Rfx 7000035564)** | Hiring of vehicle at 220kV ONGC (PNL) Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 5 | Tender-5 **(Rfx 7000035565)** | Hiring of vehicle at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 6 | Tender-6 **(Rfx 7000035574)** | Hiring of vehicle at 220kV Wadkhal Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 7 | Tender-7 **(Rfx 7000035572)** | Hiring of vehicle at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 8 | Tender-8 **(Rfx 7000035573)** | Hiring of vehicle at 100kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 9 | Tender-9 **(Rfx 7000035576)** | Hiring of vehicle at 100kV Thal Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 10 | Tender-10 **(Rfx 7000035578)** | Hiring of vehicle at 100kV Khopoli Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 11 | Tender-11 **(Rfx 7000035579)** | Hiring of vehicle at 100kV Patalganga Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 12 | Tender-12 **(Rfx 7000035591)** | Hiring of vehicle at 100kV Jite Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 13 | Tender-13 **(Rfx 7000035592)** | Hiring of vehicle at 220kV Ulwe (GIS) Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026 | **5,81,455/-** |
| 14 | Tender-14 **Rfx 7000035594)** | Hiring of LMV vehicle (TATA SUMO/Scorpio/Ertiga or Equivalent) for EHV lines Sub-Division Panvel-2 under EHV (O&M) Division Panvel from 01.04.25 to 31.03.2026 | **5,80,213/-** |
| 15 | Tender-15 **(Rfx 7000035595)** | Hiring of MMV vehicle ( Mahindra Pickup or equivalent) for EHV Lines Maint. Sub-Division Panvel-I at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026. | **5,99,207/-** |
| 16 | Tender-16 **(Rfx 7000035597)** | Hiring of MMV vehicle ( Mahindra Pickup or equivalent) for EHV Lines Maint. Sub-Division Panvel-II at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2025 to 31.03.2026. | **5,99,207/-** |
| 17 | Tender-17 (**Rfx 7000035598**) | Hiring of vehicle of LMV for the office of EHV S/S Maint. S/Dn. Apta for period 01.04.2025 to 31.03.2026. | **5,71,961/-** |
| 18 | Tender-18 **(Rfx 7000035600)** | Hiring of vehicle of MMV for the office of EHV S/S Maint. S/Dn. Apta for period 01.04.2025 to 31.03.2026. | **5,99,207/-** |

**EMD 1% of estimated cost for each Tender.**
**Tender Fees :- Rs. 500/- + GST**
**Submission of bids from 06.03.2025 to 20.03.2025 up to 10:59 hrs**,
**Opening date:-20.03.2025 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: **The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 9769213818** E-mail ID **ee7210@mahatransco.in**

SD/-
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL.**

# महिला सक्षमीकरणासाठी झटणाऱ्या प्रियदर्शनी मोरे



जनतेच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या अधिकारी म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांच्याकडे पहिले जाते. प्रियदर्शनी मोरे या यापूर्वी पंचायत समिती उस्मानाबाद, पंचायत समिती पन्हाळा, जिल्हा परिषद कोल्हापूर विविध पदांवर कार्यरत होत्या. आपल्या कार्यकाळात त्यांनी पाणी व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवानोन्नती अभियान, घरकुल योजनेत भरीव कामगिरी बजावली आहे. रायगड जिल्हा परिषदेत ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत असताना जिल्ह्यात महिला बचत गट चळवळ गतिमान करीत, महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरढोण नावाच्या छोट्या गावातल्या एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील प्रियदर्शिनी मोरे यांचा जन्म झाला. वडील चंद्रकांत मोरे आणि आई संजीवनी मोरे दोघेही उच्च शिक्षित आणि समाजाप्रती बांधिलकी ठेऊन जगणारे! त्यामुळे लहानपणापासून तसे संस्कार त्यांच्यावर झाले. इ.६ वी मध्ये असताना एका स्पर्धा परीक्षा केंद्राची जाहिरात वृत्तपत्रामध्ये वाचून आपणही अधिकारी व्हावे असे त्यांनी ठरवले आणि त्यांच्या त्या स्वप्नाला त्यांच्या आई-वडिलांनी बळ दिले. स्पर्धा परीक्षा देऊन त्यांची प्रथम प्रयत्नात २००९ साली विक्रीकर निरीक्षक पदावर निवड झाली. एक वर्ष या पदावर काम करत असतानाच त्यांची राज्यसेवा परीक्षेतून उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ गटविकास अधिकारी वर्ग-१ या पदावर निवड झाली.

त्या प्रथम गट विकास अधिकारी (वर्ग-१) पंचायत समिती उस्मानाबाद या पदावर रुजू झाल्या. या पदावर कार्यरत असताना त्यांनी पाणीटंचाईचा विषय संवेदनशीलपणे हाताळून प्रत्येक गावात पाण्याच्या पर्यायी स्त्रोतांचे प्रभावी व काटेकोर नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत केला. त्याचा परिणाम म्हणून जिल्ह्यातील सर्वात मोठा टंचाईग्रस्त जिल्हा असतानाही सर्वात कमी टँकर लावण्याची गरज पडली. त्यामुळे शासन खर्चात बचत झाली.

यानंतर गट विकास अधिकारी, पन्हाळा व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता ), जि. प. कोल्हापूर या पदावर कार्यरत असताना त्यांना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले. यामध्ये भारत सरकारतर्फे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारी गट विकास अधिकारी म्हणून २०१७ साली मा. मंत्री, पेयजल व स्वच्छता, भारत सरकार यांच्या हस्ते सन्मान, राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छ आणि सुंदर शौचालय स्पर्धेत जिल्ह्याला दुसरे स्थान मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली त्याबद्दल २०१९ साली मा. मंत्री, पेयजल व स्वच्छता, भारत सरकार यांच्या हस्ते सन्मान, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत स्वच्छता दर्पण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी २०२० साली केंद्र शासनाच्या वतीने आमिर प्रसिद्ध अभिनेता खान यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जागतिक शौचालय दिनानिमित्त उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण कार्यासाठी केंद्र सरकारतर्फे सन्मान, जल जीवन मिशनांतर्गत १००% उद्दिष्टे पूर्ण करून वैयक्तिक नळ जोडणी देण्यात आणि त्यांचे ऑनलाइन नोंदणी पूर्ण करण्यात राज्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांच्याहस्ते सन्मान इ प्रमुख पुरस्कार व सन्मानांचा समावेश आहे.

कोल्हापूरमधील पदावधी पूर्ण झाल्यानंतर त्या पदोन्नतीने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड या पदावर रुजू झाल्या. या पदाच्या प्रमुख जबाबदाऱ्यामध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ग्रामीण महिला स्वयंसहायता गटांची बांधणी, त्यांना प्रशिक्षण आणि अर्थपुरवठा करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे व त्यांना प्रवाहात आणणे या प्रमुख जबाबदाऱ्या आहेत. यास अनुसरून मागील दोन वर्षात राज्य पुरस्कृत घरकुल योजना अंतर्गत प्राप्त उद्दिष्टानुसार ५ हजार ३५० व केंद्र पुरस्कृत २७ हजार अशा एकूण ३२ हजार ३५० घरकुलाना मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी विशेष मोहीम राबवून प्रयत्न करण्यात आले आहे. मागील काही वर्षांतील हा सर्वाधिक घरकुल मंजुरीचा आकडा आहे. येणाऱ्या आर्थिक वर्षात ही घरकुले पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवानोन्नती अभियान अंतर्गत सध्या जिल्ह्यात १९ हजार २१६ गट कार्यरत असून ८८३ ग्रामसंघ व ५९ प्रभागसंघ स्थापन करण्यात आले आहेत. मागील दोन वर्षांत फिरता निधी, समुदाय गुंतवणूक, जोखीम प्रवणता निधी इ स्वरुपात सुमारे ७३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून बँक कर्ज पुरवठा सुमारे ४०६ कोटी २५ लाख इतका उपलब्ध करून देण्यात आला आहे. या माध्यमातून स्वयं सहायता गटातील महिला होम स्टे, मसाले, कडधान्ये, लाडू बनवणे, ड-छ्खढ-ठध झ-उ्ङ बनवणे, गणपती मूर्ती बनवणे, खानावळ , सेंद्रिय भाजीपाला इ व्यवसाय करून स्वताच्या पायावर उभ्या राहत आहे

**-प्रकाश सोनावडेकर,** अलिबाग

# महिला वायरमन मोनिका औचटकर



वायरमन या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी. वायरमनचे काम तसे जोखमेचे व आव्हानात्मक त्यामुळे महिला या क्षेत्रात येत नाहीत. परंतु मोनिका औचटकर हिने हे क्षेत्र निवडले. ती सद्या महावितरण कंपनीमध्ये वायरमन म्हणून काम काम करते. विजेच्या खांबावर चढून वीजजोडणी करते.

मोनिका औचटकर ही अलिबाग तालुक्यातील महाजने येथील मुळची रहिवासी. सध्या ती उसर येथे राहत आहे. बारावी पर्यंत शिक्षण झाल्यावर पुढे काय करायचे असा प्रश्न तिच्या समोर निर्माण झाला होता. व्यावसाय प्रशिक्षण घेण्याचा निर्णय तिने घेतला. आयटीआयमध्ये प्रवेश घेऊन तिने दोन वर्षाचा इलेक्ट्रीशनचा अभ्यासक्रम पुर्ण केला. तेथे एक वर्ष प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले.

मोनिका नोकरीच्या शोधात होती. कोरोनामुळे एक वर्षभर घरात बसण्याची वेळ आली. तिने छोटी घरगुती विजेची कामे. करण्यास सुरुवात केली. त्यामुळे या क्षेत्राबद्दल आवड निर्माण झाली. मोनिकाला तिच्या आईने प्रोत्साहन दिले . वीज जोडणीची छोटी कामे करत असताना महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी कर्मचारी घेत असल्याची माहिती मिळाली.अलिबागमधील तत्कालीन कार्यकारी अभियंता तपासे यांच्या कार्यालयात जाऊन तिने कंत्राटी कर्मचारी निवड करण्याची मागणी केली. त्यांनी तात्काळ दखल घेत मोनिकाला महावितरण कंपनीमध्ये काम करण्याची संधी दिली.

सुरुवातीला उसर स्विचींग सेंटरमध्ये ऑपरेटर म्हणून काम मिळाले. हे काम करीत असताना मीटर लावणे आदी कामे करण्यास सुरुवात केली. फणसापूर व रामराज शाखेतील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांकडून या क्षेत्राबद्दल माहिती घेतली. थकीत बिलाची वसूली करण्यापासून विद्यूत पोलावर चढणे, तार व अन्य विद्यूत साहित्यांची जोडणी करण्याचे काम ती करू लागली.

आता मोनिका आपल्या पुरुष सहकाऱ्यांसोबत विजेच्या खांबावर चढून विद्यूत जोडणीचे काम करते. वीज जोडणीचे पुरुषच करीत होते. मोनिका औचटकर हिने दाखवून दिले आहे की आता या क्षेत्रात महिला देखील मागे नाहीत.

**-प्रकाश सोनावडेकर,** अलिबाग



# श्रीवर्धन येथील भरतनाट्यम नृत्यांगना निकिता वैद्य



**श्रीवर्धन** ब्राह्मण नृत्य सभा या संस्थेचे माजी अध्यक्ष विनय वसंत वैद्य यांच्या पत्नी, निकिता विनय वैद्य या मूळच्या मुंबईच्या. लग्न होऊन श्रीवर्धन येथे आल्यानंतर त्यांनी आपला भरतनाट्यम नृत्य करण्याचा छंद जोपासताना अनेक लहान मुलींना व महिलांना देखील भरतनाट्यमचे प्रशिक्षण दिले . सतत सात वर्षे भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी विशारद ही पदवी प्राप्त केली आहे. २०१२ पासून श्रीवर्धन शहरामध्ये त्या भरतनाट्यमचे क्लासेस घेत आहेत. यामध्ये पाच ते सहा वर्षाच्या मुलींपासून ते महिलांपर्यंत त्यांच्या क्लासमध्ये उपस्थिती असते.

पाच वर्षांपासून निकिता वैद्य या झुंबा क्लासेस देखील श्रीवर्धन येथे घेत आहेत. त्यामुळे अनेक ४० ते ४५ वयोगटातील महिलांना आपले वजन कमी करणे साध्य होत आहे. ठाणे येथे मागील वर्षी पार पडलेल्या मंगळागौरी नृत्य स्पर्धेमध्ये निकिता वैद्य यांच्या समूहाने चौथा क्रमांक प्राप्त केला होता. श्रीवर्धन सारख्या ग्रामीण भागातून जाऊन एका शहरामध्ये चौथा क्रमांक मिळवणे ही देखील खूप मोठी गोष्ट आहे. त्याचप्रमाणे रोहे येथील मंगळागौरी स्पर्धेत देखील त्यांनी चांगल्या प्रकारे यश संपादन केले होते.

भरतनाट्यम व झुंबा या नृत्यांसोबतच विविध लोकनृत्य, त्याचप्रमाणे नृत्याचे विविध प्रकार यामध्ये देखील त्यांनी सहभागी होऊन व आपल्या शिकविलेल्या विद्यार्थ्यांना घेऊन अनेक स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. आज आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्रीवर्धन सांस्कृतिक व पर्यटन विकास मंडळ या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये मारवाडी लोकनृत्य व वारकरी संप्रदायाचे टाळ मृदुंगावरील नृत्य इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मुंबईसारख्या एका मोठ्या शहरातून येऊन श्रीवर्धन या शहरात नृत्याची आवड जोपासण्याचा त्यांचा हातखंडा वाखाणण्यासारखा आहे. **-संतोष चौकर, श्रीवर्धन**



# लेखिका अरुणा भागवत

**पोलादपूर** शहरातील प्रतिथयश लेखिका अरुणा अजित भागवत यांच्या आई सुसंस्कृत कवयित्री देवधरबाई यांच्याकडून लेखन वारसा मिळवून विवाहानंतर माणगांव तालुक्यातील गोरेगाव येथील खासगी शाळेमध्ये शिक्षिका आणि पोलादपूर येथे लहानग्या मुलांचे संस्कारवर्ग शिकविताना लेखनाची आवड जोपासणाऱ्या भागवत यांची बालनाटयनिर्मितीपासून लेखनसेवा सुरू झाली.

त्या वेळी ही बालनाटय रंगमंचावर सादर होताना पाहून लेखनाची प्रेरणा अधिकच वाढली आणि 'या लाडक्या मुलांनो', 'आनंद फुलवू या' हे दोन बालकथासंग्रह आणि 'जंतरमंतर छू' हे बालनाटय अशी बालवाङ्मय निर्मिती पुस्तकरूपाने भागवत यांच्या हातून घडली. याच काळात अरूणा भागवत यांनी 'दक्षता' या पोलीस आणि गुन्हेगारीविषयक पाक्षिकामध्ये काही गुन्हेगारी कथा पाठविल्या आणि त्या वेळोवेळी प्रसिध्दही झाल्या. विविध कथास्पर्धा मध्ये सहभाग, दैनिक व साप्ताहिकांमध्ये लेखन यामुळे कथासंग्रह आणि बालवाङ्मय निर्मितीसाठी पुरेसे साहित्य त्यांच्या हातून लिहिले गेले. याच कथांमुळे 'गुलाम' हा कथासंग्रहदेखील अरूणा भागवत यांनी लिहिला आहे.

२००३ मध्ये लघुकथालेखन स्पर्धेचे आयोजन मुंबई वृत्तपत्र लेखक संघातर्फे करण्यात आले असता अरूणा भागवत यांच्या 'छोटीशी चूक' या कथेला प्रथम क्रमांक जाहिर झाला आणि हे पारितोषिक त्याकाळातील राज्यातील ज्येष्ठ पत्रकार स्व.यशवंत पाध्ये यांच्याहस्ते त्यांनी स्विकारले. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या पोलादपूर शाखेसाठी सक्रीय साहित्यिक म्हणून अरूणा



भागवत यांचे दैदिप्यमान कार्य रायगड जिल्ह्यातील बिगरसाहित्यिक पदाधिकाऱ्यांच्या नजरेत खुपणारे ठरले.

आपल पोलादपूर या साप्ताहिकाच्या वर्धापनदिनानिमित्त सक्रीय साहित्यिक म्हणून अरुणा अजित भागवत यांना गौरविण्यात आल. २००६-०७मध्ये उत्कृष्ट मराठी बालवाङ्मय निर्मितीसाठी 'या लाडक्या मुलांनो' या बालकथा संग्रहाला महाराष्ट्र राज्याच्या साहित्य व संस्कृती मंडळातर्फे साने गुरूजी बालवाङ्मय पुरस्कार जाहिर झाला आणि हा पुरस्कार अमरावती येथे ज्येष्ठ कवी फ.मुं.शिंदे यांच्या हस्ते भागवत यांनी स्विकारला. भागवत यांच्या साहित्यनिर्मितीची या पुरस्कारानंतर राज्यपातळीवर घेतलेली दखल कोकणात सर्वत्र लक्षणीय ठरली. याचवेळी २०१३मध्ये त्यांच्या 'आनंद फुलवू या'या बालकथा संग्रहाला महाराष्ट्र राज्याच्या साहित्य व संस्कृती मंडळातर्फे 'विख्यात लेखक भा.रा.भागवत पुरस्कार' देऊन उत्कृष्ट मराठी बालवाङ्मय निर्मितीसाठी गौरविण्यात आले. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार भागवत यांनी दादर येथे स्विकारला. अलिकडे पोलादपूर तालुक्यातील आकार प्रतिष्ठानतर्फे कापडे बुद्रुक येथे भागवत यांच्या साहित्यनिर्मितीची स्थानिक पातळीवर दखल घेऊन त्यांचा सत्कार झाला.

लेखनासोबत भागवत यांनी महिला दक्षता समितीवर सदस्यत्वाद्वारे महिलांचे सामाजिक व कौटूंबिक प्रश्न सोडविण्यात सहभाग घेतला. महिलांना संघटित करून बचत गटाद्वारे बचत व नवीन उत्पन्नस्रोतांची निर्मिती अशी आवड निर्माण केली आहे. यशस्वी साहित्यनिर्मितीबाबत त्यांनी बोलताना, वाचनाद्वारे समृध्द केल्यानंतरच लेखनाची गोडी जोपासणे उपयुक्त ठरते. उत्तम वाचक हा नक्कीच उत्तम लेखक होऊ शकतो आणि वाचता वाचता आयुष्याचा सूर गवसतो तसेच खऱ्या अर्थाने निखळ आनंद घेत लेखन करता येऊ शकते, असे मत व्यक्त केले आहे.

**-शैलेश पालकर, पोलादपूर**

# अपघातग्रस्तांना मदत करणारी भक्ती साठेलकर



भक्ती गुरूनाथ साठेलकर या पेशाने सिव्हील इंजिनियर असून त्या खोपोली नगरपरिषदेमध्ये सिटी कॉर्डिनेटर या पदावर कार्यरत आहेत. त्याच प्रमाणे 'रोपवन ' या रोपवाटिकेच्या संचालिकादेखील आहेत. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी आघाडीवर असलेल्या हेल्प फाउंडेशनच्या त्या समन्वयक आहेत. आजवर त्यांनी शेकडो अपघात आणि अनेक आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदत कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेतलेला आहे. १५ एप्रिल २०२३ रोजी बोरघाटात झालेल्या भीषण बस अपघातात त्यांनी अत्यंत प्रभावीपणे काम करून दरीत कोसळलेल्या जखमी प्रवाशांना मदत करून जीवदान देण्यात आणि मृत प्रवाशांच्या कुटुंबीयांना सहकार्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. १९ जुलै २०२३ रोजी इर्शाळवाडी येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घघटनेच्या ठिकाणी रातोरात प्रथम पोहचून सरकारी, निमसरकारी आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधत दरडग्रस्तांना तत्काळ मदत पोहोचावी या दृष्टीकोनातून समन्वयकाची भूमिका बजावली होती. त्याचप्रमाणे सलग चार दिवस दरडग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यातदेखील मोलाची मदत केली होती. या योगदानाची दखल महाराष्ट्र राज्य विधान सभा सभागृहातदेखील घेतली गेली होती. फक्त रस्ते अपघातच नव्हे तर अग्निशमन यंत्रणेसोबत त्या तत्सम दुर्घटनांमध्ये सहकार्य करतात, रसायन आणि वायुगळतीमुळे झालेल्या अपघातातदेखील मदतनीस म्हणून भूमिका बजावतात. पूर परिस्थितीत आणि पाण्यात बुडून झालेल्या अपघातातही त्या प्रत्यक्ष सहभाग घेतात. वेळप्रसंगी आवश्यक असलेल्या स्कुबा डायव्हिंगचे प्रशिक्षण त्यांनी घेतले आहे. त्या प्राणी, पक्षी मित्र म्हणूनही वनखात्यासोबत आपली जबाबदारी पार पाडतात. कुशल सर्पमित्रांकडून त्यांनी विषारी आणि बिनविषारी साप पकडण्याचे प्रशिक्षण घेतले असून त्या स्नेक रेस्क्यूअर्स खालापूर खोपोली या संस्थेच्या सदस्या देखील आहेत. सार्वजनिक स्वच्छता आणि पर्यावरण संतुलन कामी त्या अनेक विविध उपक्रमात सहभागी होतात. त्याचसोबत तशा अभियानांचे आयोजन करतात. प्रथमोपचार आणि सुरक्षाविषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून मार्गदर्शन करतात. त्या उत्तम वक्त्या असल्याने विविध संस्थांच्या

मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८, अनेक राज्य रस्त्यावर झालेल्या अपघातात आणि विविध आपत्कालीन घटनांमध्ये त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान केला आहे. त्यांना राज्य, जिल्हा, तालुका आणि नगरपरिषद स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. कोणत्याही क्षेत्रात आपण कोणतीही जबाबदारी पेलू शकतो अशा आत्मविश्वासाने त्या सदैव कार्यरत असतात.

**-अरुण नलावडे, खालापूर**

# विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्या विनया ढेपे



गोरगरीब जनतेची मुलं - मुली शिकल्या पाहिजेत हा उद्दात हेतू नजरेसमोर ठेऊन विवा कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळे उपक्रम करण्याची संधी देऊन विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिमत्व म्हणजे विनया विवेक ढेपे. यांच्या कॉलेजचे नाव अल्प कालावधीत रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रात सर्वदूर पोहचले आहे.

विनया ढेपे या उच्च शिक्षित महिला असून त्यांनी १२ वी उत्तीर्ण झाल्यावर पुढे बीएससी फॅशन डिझायनिंग डिग्री कोर्स केला. त्यांचे पती डॉ.विवेक ढेपे हे देखील उच्च शिक्षित आहेत . पुढे या दाम्पत्यांनी गोरगरीब जनतेची मुलं - मुली शिकली पाहिजेत याचा विचार करीत माणगावात व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे विविध कोर्सेसचे विवा नावाने कॉलेजची स्थापन २०१८ मध्ये केली. या कॉलजमध्ये हॉटेल मॅनेजमेंट,फॅशन डिझायनिंग,ए.एन.एम,जी.एन.एम.नर्सिंग,डीएमएलटी,मोटार मेकॅनिक,इलेक्ट्रेशन,ग्राफिक्स डिझायनिंग,बीसीए आदी व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम कोर्सेस शिकविले जातात. अनुभवी प्राध्यापकवर्ग या कॉलजमध्ये आहे. सुरवातीला आठ विद्यार्थ्यांनी सुरु झालेल्या या कॉलेजमध्ये आज ३५० विद्यार्थी विविध कोर्सेसचा अभ्यासक्रम शिकत असून फार कमी अवधीत कॉलेजचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

रायगड जिल्ह्यासह रत्नागिरी, अहमदनगर, सातारा, कोल्हापूर, गुहागर, जळगाव,नाशिक, सिंधुदुर्ग,गोवा,गुजरात येथूनही विद्यार्थी या कॉलजमध्ये विविध कोर्सेसचे अभ्यासक्रम शिकत आहेत. या कॉलजमधील विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देण्याच्या इराद्याने हे ढेपे दाम्पत्य विशेष प्रयत्नशील आहेत. वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमामध्येही या कॉलेजचे विद्यार्थी अग्रक्रमाने पुढे असतात. कॉलेजच्या चेअरमन या नात्याने त्यांचे कॉलेजकडे विशेष लक्ष असते.

आपले पती डॉ. विवेक ढेपे यांच्या खांद्याला खांदा लावून विनया ढेपे हे कॉलेज चालवीत आहेत. सध्या हे कॉलेज माणगाव निजामपूर रस्त्यावर कालव्यालगत भाड्याच्या इमारतीत असून लवकरच या कॉलेजची स्वतःच्या मालकी हक्काची इमारत माणगाव तालुक्यातील निळगुण गावच्या हद्दीत प्रशस्त जागेत साकारली जाणार असून काही दिवसांत या इमारतीच्या कामाचा शुभारंभ होणार आहे. या कॉलजमधून विद्यार्थ्यांना उत्तोमोत्तम शिक्षण देण्याचा व त्यातून विद्यार्थी घडविण्याचा विनया ढेपे यांचा प्रामाणिक प्रयत्न सुरु आहे. या कॉलजमधून गेल्या आठ वर्षात विविध कोर्सेसचे ज्ञान आत्मसात करून अनेक विद्यार्थी बाहेर पडले असून अनेक विद्यार्थी आज भारत देशात तसेच देशाबाहेर चांगल्या ठिकाणी चांगल्या पदावर नोकरी करीत आहेत.

कॉलेजचे कामकाज पाहत असताना विनया ढेपे या सार्वजनिक कामातही आग्रेसर होऊन काम करीत असतात. वृक्षारोपण,रक्तदान शिबीर,जनजागृतीपर कार्यक्रम अशा विविध उपक्रमात त्या सक्रिय सहभाग घेत असतात. आजचा विद्यार्थी हा उद्याच्या भारताचा भावी नागरिक आहे हे ओळखून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्या प्रयत्नशील असतात.

**-सलीम शेख, माणगाव**

# वीटभट्टीवरील मुलांसाठी 'ती' बनली सरस्वती!

आदिवासी, कातकरी समाजातील कुटुंब वीटभट्टी कामगार म्हणून कायम स्थलांतरण करत असतात. त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण होण्यात अडचणी असतात. परिणामी ती मुलेदेखील मोठी होऊन तेच काम करतात. हे चित्र पाहून नेरळ बिरदोले येथील बारावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीचे मन हेलावले. त्यांनादेखील शिक्षणाचा अधिकार आहे. त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे. अशा मुलांनी शिकले पाहिजे ही उदात्त भावना घेऊन भाविका भगवान जामघरे ही तरुणी पुढे आली आणि त्या मुलांसाठी भाविकाने वीटभट्टीवरच शाळा सुरू केली.



सुरवातीला असलेली २५ मुलांची संख्या आज ४५वर पोहचली आहे, तर तिच्या प्रयत्नांमुळे सहा मुले आज आश्रमशाळेत आपले पुढील शिक्षण घेत आहेत. स्वतः लहान असताना लहानग्यांसाठी भाविकाने उचलेल्या या पावलाचे, तिच्या जिद्दीचे आज करावे तितके कौतुक कमी आहे.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो हे प्राशन करेल तो समाजावर, आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचार यावर बंड करून उठल्याशिवाय राहणार नाही. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे वाक्य आजच्या परिस्थितीला तंतोतंत लागू होते. काळ बदलत गेला, नुसता बदलला नाही तर आधुनिक झाला आहे. जग एका हातात मोबाईलवर येऊन ठेपले आहे. आजचे युग हे स्पर्धेचे असून यात टिकण्यासाठी शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे हे सांगायची नक्कीच गरज नाही.

नेरळपासून दामत गावाकडे जाणाऱ्या पेशवाई रस्त्याजवळून उल्हास नदी वाहते. त्यामुळे या रस्त्याच्या दुतर्फा अनेक वीटभट्ट्या आहेत. या भागातून प्रवास करताना बिरदोले या गावातील कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असलेल्या भाविका भगवान जामघरे या विद्यार्थिनीला या मुलांची ही स्थिती कायम दृष्टीस पडायची. भाविकाचे वडील भगवान जामघरे हे रिक्षाचालक आहे. त्यातूनच त्यांचा उदरनिर्वाह होत भाविकाचे शिक्षणदेखील होत आहे. वीटभट्टीवरील मुलांनीही शिकले पाहिजे या भावनेतून शिकवणी वर्ग सुरू करण्याचा हट्ट भाविकाने आपल्या वडिलांकडे धरला. वडिलांनीदेखील भाविकाच्या समाजाप्रती विचार करण्याच्या विचारधारेला हसतमुखाने दुजोरा दिला.

नेरळ एसटी स्टँड येथे रिक्षाचालक असललेले भगवान जामघरे यांनी आपल्या तुटपुंज्या आर्थिक उत्पन्नातून वीटभट्टीवरील मुलांच्या शाळेसाठी पाटी, पेन्सिल घेऊन दिल्या आणि १४ नोव्हेंबर २०२१ रोजी बाल दिन साजरा होत असताना वीटभट्टीवरील मुलांची अनौपचारिक शाळा सुरू झाली. आज या मुलांची भाविकादिदी त्यांच्यासाठी सरस्वती सामान आहे.

**-दर्वेश पालकर, नेरळ**

# जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे

शासनाच्या योजना, त्याबाबत जागृती, योजनांची वस्तुनिष्ठ माहिती विविध माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहचविणे आणि शासनाची जनमानसात प्रतिमा निर्माण करण्याचे काम शासनाचा माहिती आणि जनसंपर्क विभाग करत असतो, मात्र शासनाच्या योजनांची केवळ छापील महिती देण्यापुरतेच मर्यादित न राहता शासन, अंमलबजावणी यंत्रणा आणि जनता यांच्यात समन्वय साधून त्याचा पाठपुरावा करण्याचे काम जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे-देशमुख करीत आहेत.

शासनाची जनसंपर्क अधिकारी या नात्याने मनिषा पिंगळे आपली जबाबदारी चोखपद्धतीने गेली १८ वर्षे पार पाडत आल्या आहत. जिल्हा प्रशासन आणि माध्यम यांच्यात त्यांनी सुसंवादाचे पूल उभे केले आहे. विविध कार्यक्रम, मोहिमा, निवडणूक, मानव निर्मित आपत्ती, नैसर्गिक आपत्ती काळात जिल्हा माहिती अधिकारी या नात्याने केवळ माहिती पोहचविण्याची जबाबदारीची त्यांनी या काळात केवळ पार पाडली नाही, तर त्यांच्यात मूळात असलेल्या सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडविले आहे.



याआधी त्यांनी पुण्यात विभागीय माहिती सहायक संचालक, म्हणून जबाबदारी बजावली आहे. शासनाच्या महान्यूज या वृत्त संकेतस्थळाच्या निर्मिती प्रक्रियेत तसेच न्यू लोकराज्य या मासिकाच्या वितरणातही त्यांनी जबाबदाऱ्या पार पडल्या आहेत. त्यामुळेच पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली तेव्हा जिल्ह्यात माहिती कार्यालयाला जागा मिळवण्यापासूनचा श्री गणेशा त्यांनी केला. नवीन जिल्हा असल्याने त्यात आदिवासी भाग यामुळे आदिवासी थेट माहिती कार्यालयात योजनांची माहिती घ्यायला यायचे. त्यांना निराश न करता पिंगळे संबंधित योजनांची माहिती द्यायच्या. जिल्हा माहिती अधिकारी ठाणे, गृहमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, कृषी मंत्री, पाणीपुरवठामंत्री, महसूलमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून कामे पाहिली आहेत. शासनाच्या योजनाची माहिती सर्वदूर पोहचविताना त्याचा लाभ देण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

मुद्रासारख्या योजनेतून एका गरीब, आदिवासी मुलाला रिक्षा घेता आली. त्या मुलाच्या आजीचे आनंदाश्रू पाहून मिळालेले समाधान शब्दात सांगता येणार नाही, असे त्या सांगतात.

मनिषा पिंगळे यांच्या सेवातत्परतेला पती शिवाजी देशमुख आणि वडील मोहन पिंगळे यांनी कधीही आडकाठी केली नाही. उलट सासर-माहेरचे मला सतत प्रोत्साहन असते. वडिलांकडून मला कार्यतत्परतेचे आणि सेवाभावाचे बाळकडू मिळाल्याचे त्या सांगतात. पिंगळे यांचा स्वभाव बोलका आहे. जनसंपर्काला केवळ बोलणं नाही तर सुसंवादी सूर लागतो. शासन आणि जनता, जनतेचे प्रतिनिधी असलेली माध्यमे यांच्यात तो सुसंवादी सूर निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.

**-प्रकाश सोनवडेकर, अलिबाग**



# उद्योजिका हर्षला साबळे



कर्जत तालुक्यातील पोसरी या ग्रामीण भागात राहणाऱ्या हर्षला योगेश साबळे यांनी स्पोर्ट्स गारमेंट उद्योग सुरू करून या परिसरातील महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांनी हा उद्योग सुरु केला असला तरी या उद्योगात यशस्वी होण्यासाठी त्यांचे पती योगेश साबळे यांचा अनुभव व मोलाचे मार्गदर्शन त्यांना लाभत आहे.

हर्षला यांचे माहेर मुरबाड तालुक्यातील सासणे गाव. आई, वडील, एक बहीण आणि दोन भाऊ असे षटकोनी कुटुंबात त्या लहानच्या मोठ्या झाल्या. शालेय शिक्षण झाल्यावर त्यांनी टेलरिंगचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांचा विवाह जवळच असलेल्या भुवन गावातील योगेश बुधाजी साबळे यांच्याशी २००९ साली झाला. योगेश साबळे हे वाशी येथील एका गारमेंट फॅक्टरीत नोकरीला होते. नोकरीत त्यांना रस वाटत नव्हता. त्यामुळे हर्षला यांनी त्यांना स्वतःचा उद्योग सुरू करण्याचा सल्ला दिला. त्यावर योगेश यांनी सांगितले तूच पुढाकार घे. मी हवी ती मदत करीन. त्यानुसार हर्षला यांनी गारमेंट उत्पादन काढण्याचा उद्योग करण्याचा निर्णय घेतला.

दहा वर्षांपूर्वी हर्षला यांनी गारमेंट उत्पादन मुरबाड तालुक्यातील भुवन येथे सुरू केले, मात्र तेथे दळणवळणाची व्यवस्था, तालुक्याच्या ठिकाणापासून लांब असलेले गाव आदी कारणांमुळे त्यांचा उद्योग हवा तसा बहरत नव्हता. त्यांची मोठी बहीण कर्जत तालुक्यातील पोसरी गावात राहात होती. त्या बहिणीने गारमेंटचा उद्योग कर्जतमध्ये करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार सात वर्षांनंतर त्यांनी पोसरी येथे हा उद्योग सुरु केला. तीन वर्षातच त्यांचा हा उद्योग बहरला.

टी शर्ट तयार करण्यापासून त्यावरील प्रिंटिंग तसेच ट्रॅक सूट, क्रिकेट ड्रेस आदी उत्पादन हर्षला व सहकारी घेत असून शंभर ते एक हजार रुपयांपर्यंतचे टी शर्ट, तर शंभर ते पाचशे रुपयांपर्यंते ट्रॅक सूट त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. पूर्वी या उत्पादनासाठी उल्हासनगर, ठाणे, मुंबई, पुणे येथे जावे लागत असे. आता हे उत्पादन तालुक्यात उपलब्ध झाल्यामुळे चांगली सोय झाली आहे. त्यांच्या या उद्योगामुळे या परिसरातील गावच्या पंधरा-सोळा महिलांना रोजगार मिळतोय.

**-विजय मांडे, कर्जत**

# कर्तव्यदक्ष सरपंच रितू ठोंबरे



खालापूर तालुक्यातील चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू सुधीर ठोंबरे यांच्याकडे एक कर्तव्यदक्ष सरपंच म्हणून पाहिले जाते. कॉलेज जीवनात थेट सरपंचपदाची निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या.

कॉलेज जीवनात अभ्यास करणे, पदवी घेणे, मित्र-मैत्रीण यांच्या बरोबर आनंद व्यक्त करणे अशा गोष्टी करण्याच्या काळात आई-वडिलांचा समाजसेवेचा वारसा पुढे नेण्यासाठी रितू ठोंबरे यांनी प्रयत्न सुरू केला. चौक ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक लढताना थेट सरपंचपदाची निवडणूक त्यांनी लढवली आणि बाजी मारली. त्यानंतर त्यांनी कार्यालयात सामान्यांचा शिरस्ता सुरू केल्याने जनता दरबार सुरू झाला. त्यामुळे सहा महसुली गावे, अनेक वाड्या वस्त्या आणि डोंगराळ भागातील दुर्मिळ गावातील लोकांचा संपर्क सुरू झाला. चौक बाजारपेठेतील वाहतूक कोंडी, रस्त्यावरील अतिक्रमणे, उघडी गटारे, पाण्याचा फिल्टर प्लांट, पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन, घरपट्टी, ग्रामीण रुग्णालय रस्ता या समस्यांकडे सरपंच रितू ठोंबरे यांनी लक्ष केंद्रित केले. समस्या निर्माण झाली त्या ठिकाणी स्वतः गाडी चालवत प्रत्यक्ष जाऊन ती सोडविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे. एका मध्यरात्री इरसालवाडीची दुर्घटना घडली. त्या वेळी यंत्रणा, कर्मचारी यांच्याबरोबर सरपंच रितू यांनी इरसालवाडी गाठली आणि जमेल तेवढी मदत केली. त्यानंतर चौक येथे कंटेनर हाऊस कॅम्पची उभारणी करताना तेथे नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली आणि नवीन इरसाल वाडी उभी करण्यास प्रशासनाला मदत केली. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्यांचा गौरव केला.

सध्या सुरू असलेल्या माझी वसुंधरा ५.० अभियानात सक्रिय सहभागी होऊन आज संपूर्ण चौक ग्रामपंचायत हद्दीत स्वच्छता, झाडे लावा व जगवा, प्लास्टिक पिशव्याबंदी, स्वच्छ पाणी, चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी सरपंच रितू ठोंबरे यांचे प्रयत्न सुरू असून तालुक्यातून माझी वसुंधरा अभियान यात अव्वल स्थान निर्माण केले आहे. एमबीएमधून आयटी केल्याने संपूर्ण माहिती त्यांना अवगत आहे. त्या संगणकावरही काम करतात. त्यामुळे प्रशासनात काय चालले आहे याची माहिती घेतात. ग्रामपंचायतीचा संपूर्ण डाटा त्यांनी तयार केला असून नाविन्यपूर्ण काम सरपंच म्हणून सुरू आहे.

**-अर्जुन कदम, चौक**

# आरोग्यासह सामाजिक सेवा देणाऱ्या डॉ. कांचन पाटील



डॉ. कांचन पाटील-वडगावकर राज्यातील महिलांसाठी आरोग्य आणि कायद्याचे काम करणारे 'मातृहृदयों' व्यक्तिमत्व! गेल्या दहा वर्षांपासून डॉ. कांचन यांनी राज्यात महिलांसाठी उभे केलेले काम आज चांगल्या गतीने एका सामाजिक गतीच्या प्रवाहात येऊन थांबले आहे.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये नेहमी स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याची मानसिकता दिसून येते. या मानसिकतेमधून अनेक स्त्रिया आपल्या चांगल्या आयुष्याला मुकतात. मुली वयात आल्या की त्यांच्या बाबतीतही पालक नेहमी नाना अडचणीत सापडतात. अशाच महिला आणि मुली यांना घेऊन डॉ. कांचन यांनी संशोधन केले. या संशोधनातून पुढे जोरकसपणे काहीतरी करायचे या भावनेतून त्यांनी स्वराज्य फाउंडेशनची निर्मिती केली. आज राज्याच्या कानाकोपऱ्यातून त्यांच्यासोबत स्वयंसेवक म्हणून जोडल्या जाणाऱ्या महिला, मुली. ते ज्या महिला-मुलींना रोज मदत करतात अशा अनेकजणींची आता एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी समाजाच्या शेवटच्या घटकातले प्रश्न हेरते आणि सोडवते.

डॉ. कांचन यांचे गाव सांगली. वडील रामचंद्र पाटील आणि आई रेखा पाटील हे शेतकरी. कुटुंबात डॉ. कांचन यांच्यावर 'सेवाभावी' संस्कार झाले. पुण्यात शिकत असताना त्यांनी अनेक सामाजिक चळवळीत आपला सहभाग नोंदविला. त्या चळवळीमध्ये महिलाविषयक असणाऱ्या गंभीर बाबींना वाचा फोडली. महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांविषयी स्वतःच्या दीडशेहून अधिक मैत्रिणींचा गट तयार केला. डॉ. कांचन यांचे पती डॉ. मनोहर वडगावकर सांगत होते, आमचे दोन दवाखाने आहेत. दोन्ही दवाखाने सामाजिक कार्यासाठी वाहून घेणारे केंद्र आहेत. आजची ही 'सावित्री' आपल्या अवतीभवती अडलेल्या, नडलेल्या असणाऱ्या अनेक 'सावित्रीं'ना आपल्या कामातून सख्खेपणाची जाणीव करून देते. ते सख्खेपण पक्क्यामध्ये राहून आपला समाज सशक्त महिलांनी सजलेला समाज व्हावा, हीच अपेक्षा! **-संजय कदम, पनवेल**

# उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे

श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारीपदी सविता गर्जे कार्यरत आहेत. त्यांचे नेहमीच महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि समानतेसाठी प्रयत्न सुरू असतात.



सविता गर्जे यांचा जन्म आणि शिक्षण नवीन मुंबईत झाले. त्यांनी बी फार्मसीचे शिक्षण घेतले आणि नंतर पोलीस विभागात एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. त्या महिलांना प्रोत्साहन देत असतात. त्यांचे म्हणणे आहे, महिलांनी त्यांच्या क्षमता ओळखून कार्यक्षेत्रात आपली भूमिका सिद्ध करावी.

सविता गर्जे यांना जीवनातील प्रेरणा त्यांच्या आईकडून मिळाली. आपला आदर्श म्हणून त्या किरण बेदी यांचा उल्लेख करतात. सविता गर्जे यांच्या मते, महिलांनी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारत कार्यक्षेत्रातही उत्कृष्ट कामगिरी करणे आवश्यक आहे. हे संतुलन त्यांच्या आत्मविश्वासाला वाव देते आणि त्यांना सक्षम बनवते. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी कडक कायद्यांची अंमलबजावणी केली पाहिजे, असे सांगितले. महिलांनी आपल्या अधिकारांसाठी आवाज उठवावा व त्यांचा आवाज ऐकला जावा, असेही नमूद केले.

**-भारत चोगले, श्रीवर्धन**

# आदिवासींसाठी कार्यरत सुचेता जोशी

जागतिक महिला दिन साजरा होतो आहे. मोहोपाडा भागातून सुचेता धनंजय जोशी या महिलांसाठी काम करीत आहेत.



सुचिता जोशी यांनी वनवासी कल्याण आश्रम या संस्थेतर्फे काम चालू केले. ही संस्था २६ डिसेंबर १९५२ रोजी स्थापन झाली. जोशी यांनी यामध्ये रायगड जिल्हा महिला प्रमुख म्हणून काम केले आहे. या संस्थेतर्फे आतापर्यंत अनेक समाजोपयोगी कार्य करण्यात आले. यामध्ये संस्कार वर्ग सुरू केले. परिसरात लक्ष्मी आय हॉस्पिटलतर्फे मेडिकल कॅम्प व मोतीबिंदू ऑपरेशन यांचे शिबिर भरवले. मुलींना शिवणयंत्र देऊन, शिवणकाम शिकवून मशीन देणे व यातून रोजगार देणे अशा पद्धतीने काम या परिसरातील आदिवासी कातकरी वाडीवर चालू केले. संस्कार वर्गासाठी मुलींना निवडणे, दर महिना मानधन देणे व दरवर्षी पिल्ले कॉलेज येथे कम्युनिटी सर्विस डे साजरा करणे, जून महिन्यामध्ये वह्या वाटप व दप्तर वाटप आणि गरज असेल तर फी भरणे ही कामे केली जातात.

सुचेता जोशी यांना दोन वर्षांपूर्वी अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळाला होता. महिला दिनाला सत्कार झाला. त्यांना घरातून सहकार्य मिळते.

**-बी.एस. कुलकर्णी, रसायनी**



# सामाजिक कार्य करणाऱ्या वर्षा शिंदे

माथेरानमधील सामाजिक कार्यकर्त्या वर्षा सुनील शिंदे यांनी महिलांसाठी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. यामध्ये प्रामुख्याने त्यांनी विधवा महिलांसाठी सुरु केलेला तिळगुळ समारंभ हा अनेक वर्षांपासून माथेरान शहरात आजसुद्धा तितक्याच आनंदाने साजरा केला जातो.

येथील अनेक सामाजिक उपक्रमात वर्षा शिंदे सहभागी असतात. पोस्ट ऑफिसमध्ये एटीएम सुविधा सुरू करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मिनीबस सुरू झाल्यानंतर माथेरानमधील विद्यार्थी आणि व्यापारीवर्गाची पायपीट कमी करण्यासाठी त्यांनी नेरळ खांडा येथे मिनीबस थांबा सुरू केला. ई-रिक्षासेवा माथेरान शहरात सुरू व्हावी यासाठी पती सुनील शिंदे यांच्या खांद्याला खांदा लावून संपूर्ण गावातील महिलांना एकत्रित करून मोर्चे आणि आंदोलने केली. सामाजिक उपक्रम करीत असताना वर्षा शिंदे यांना एका दुर्धर आजाराने ग्रासले होते. या वेळी त्यांनी न डगमगता या आजारावर मात केली.

**-संतोष खाडे, माथेरान**

# आदर्श सरपंच पूजा तवले

महिला सक्षमीकरण कार्यक्रम यशस्वीपणे राबवून महिलांच्या उन्नतीसाठी कार्य करण्याचे ध्येय उराशी ठेवून लोधिवली (ता. खालापूर)च्या थेट सरपंच पूजा तवले यांचे काम सुरू झाले आहे.



सासरचा कुठलाही राजकीय वारसा नसताना केवळ सामाजिक कार्य करण्याचे आणि महिलांना स्वावलंबी करण्यासाठी आपल्या परीने कार्य करण्याचे ध्येय ठेवून कार्य करत असल्याचे दिसून येते. महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा नळाद्वारे घरात कसा येईल यासाठी धडपड करण्यात यशस्वी झाल्याचे ते सांगतात. नुसता महिलांचा बचत गट तयार करून महिला सक्षमीकरण होणार नाही याची त्यांना कल्पना आहे. येथील आदिवासी वाडीतील बचत गटातील महिलांनी बनवलेले खाद्यपदार्थ मुंबई येथे विक्रीस गेल्याचे व ते सतत जात असल्याचे अभिमानाने त्या सांगतात.

गेल्या वर्षी नवी दिल्ली येथे जी २० ही आंतरराष्ट्रीय परिषद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झाली. सर्व देशांचे प्रमुख या परिषदेला उपस्थित होते. त्यातील एका राष्ट्र प्रमुखाचे स्वागत करण्याचा मान येथील आदिवासी महिलेला मिळाला होता याचा सार्थ अभिमान सरपंच तवले यांना आहे. त्यामुळे महिलांसाठी आणखी काम करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

स्वच्छ पिण्याचे पाणी, वृक्ष लागवड, प्लास्टिक पिशव्याबंदी, स्वच्छता अभियान हे रोजचे काम करीत असताना माझी वसुंधरा अभियान ५.० राबविण्याचा प्रयत्न सुरू असून याचे सातत्य राखण्यासाठी कार्यवाही सरपंच तवले यांनी केली आहे. यासाठी महिला बचत गट, आशा वर्कर, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ग्रामस्थ, तरुण मंडळ यांच्या सहकार्याने अभियान सुरू आहे.

**-अर्जुन कदम, चौक**


## ई-निविदा सूचना

महावितरण

स्थापत्य मंडळ कल्याण अंतर्गत खालील कार्यालयाकरीता ३ वर्षासाठी भाडेत्तवावर वाहन पुरविणे करिता (जसे की डीझेल/पेट्रोल/CNG/E-vehicle वरती चालणारी Indigo, Swift Dzire, Tour S, Amaze, Xcent व तत्सम ) ई-निविदा कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली आहे.

| निविदा क्र. | कार्यालयाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम (कर सोडुन) | बयाणा रक्कम रु |
|---|---|---|---|
| एसईसी/कल्याण/vehicle/ ई-टि-११/२०२४-२५ | स्थापत्य उपविभाग मालेगाव | ११.४८ लक्ष | ११,४८० |
| एसईसी / कल्याण/ vehicle/ई-टि-१२/२०२४-२५ | स्थापत्य विभाग नाशिक | १३.८६ लक्ष | १३,८६० |
| एसईसी/कल्याण/vehicle/ ई-टि-१३/२०२४-२५ | स्थापत्य विभाग भांडुप | १३.८६ लक्ष | १३,८६० |
| एसईसी/कल्याण/vehicle/ ई-टि-१४/२०२४-२५ | स्थापत्य उपविभाग भांडुप | ११.४८ लक्ष | ११,४८० |
| एसईसी/कल्याण/vehicle/ई-टि-१५/२०२४-२५ | स्थापत्य उपविभाग पेण | ११.४८ लक्ष | ११,४८० |
| एसईसी/कल्याण/vehicle/ई-टि-१६/२०२४-२५ | स्थापत्य उपविभाग आहिल्यानगर | ११.४८ लक्ष | ११,४८० |
| एसईसी / कल्याण/ vehicle/ई-टि-१७/२०२४-२५ | स्थापत्य मंडळ कल्याण | १३.८६ लक्ष | १३,८६० |

सर्व ई-निविदेचा विक्री कालावधी दि. ०८.०३.२०२५ ते १७.०३.२०२५ पर्यंत आहे. तसेच ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने सर्व तपशीलासह सादर करण्याची वेळ दि. १८.०३.२०२५ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत आहे. सर्व तपशिल कंपनीच्या https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेबाबतची शुध्दीपत्रके ही फ़क्त कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

संपर्क अधिकारी- कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ, कल्याण. भ्रमणध्वनी- ८८७९६२०८६० व ईमेल- secivkalyan@mahadiscom.in

**अधीक्षक अभियंता (स्था) स्थापत्य मंडळ कल्याण**

# मुंबईचा युपीवर शानदार विजय

## डब्ल्यूपीएलमध्ये अमेलिया कर, हिली मॅथ्यूज चमकल्या

**लखनऊ : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सने उत्कृष्ट पुनरागमन करत युपी वॉरियर्जचा सहा विकेट्सने पराभव केला. या विजयासह मुंबई संघ वूमन्स प्रीमियर लीग २०२५ च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहचला आहे. हा संघ आता प्लेऑफपासून अवघी काही पावले दूर आहे.

युपीने दिलेल्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने १८.३ षटकांत चार विकेट्स गमावत १५३ धावा करत शानदार विजय मिळवला. मुंबईकडून विकेटकिपर यस्तिका भाटियाने विजयी चौकार लगावत संघाचा विजय निश्चित केला.



मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, पण युपीच्या सलामी जोडीने सुरुवातीच्या षटकांमध्ये मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई केली. आठव्या षटकात ७४ धावांवर युपीने पहिली विकेट गमावली, तर पहिलाच डब्ल्यूपीए सामना खेळणाऱ्या जॉर्जिया वॉलची ९० धावांवर विकेट गमावल्यानंतर मुंबईच्या संघाने पुनरागमन केले. उत्कृष्ट फॉर्मात असलेल्या जॉर्जिया वॉलने पहिल्याच सामन्यात अर्धशतक झळकावले. जॉर्जियाने ३३ चेंडूत १२ चौकारांसह ५५ धावा केल्या आणि संघाला ग्रेस हॅरिस (२८)च्या जोडीने चांगली सुरुवात करून दिली, पण युपीचे इतर फलंदाज चांगल्या सुरूवातीचे रूपांतर मोठ्या धावसंख्येत करण्यात अपयशी ठरले. या दोन्ही खेळाडूंनंतर दीप्ती शर्माने २७ धावा तर सोफी एकलस्टनने १६ धावा करत संघाला १५० धावांचा टप्पा गाठून दिला. मुंबईकडून अमेलिया कर हिने चार षटकांत ३८ धावा देत पाच विकेट्स घेतल्या. याशिवाय हॅली मॅथ्यूजने दोन, तर नताली स्किव्हर ब्रंट आणि पारूनिका सिसोदिया यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली.

युपीने दिलेल्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईच्या संघात मोठा बदल पहायला मिळाला. फॉर्मात नसलेल्या यस्तिका भाटिया हिच्या जागी अमेलिया केर हिला हिली मॅथ्यूजसह सलामीला पाठवण्यात आले, पण दौन चौकारांसह १० धावा करून अमेलिया बाद झाली. यानंतर हिली आणि नताली स्किव्हर ब्रंटयांनी संघासाठी मॅचविनिंग भागीदारी रचली. हिलीने ४६ चेंडूत आठ चौकार आणि दोन षटकारांसह ६८ धावांची शानदार खेळी केली, तर ऑरेंज कॅप असलेल्या नताली हिने २३ चेंडूत सात चौकारांसह ३७ धावा केल्या.

यानंतर हरमनप्रीत कौर ४ धावा करून बाद झाल्यावर अमनज्योत कौर हिने १२ धावा आणि यस्तिका भाटिया हिने १० धावा करत संघाला विजय मिळवून दिला. युपीकडून ग्रेस हॅरिसने दोन, तर शनेल हेनरी आणि क्रांती गौड यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा १९ मार्चपासून ठाण्यात




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन, विश्वास सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने ७२व्या पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ठाण्यातील कॅडबरी कंपनीसमोरील जे. के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर १९ ते २३ मार्च या कालावधीत ही स्पर्धा रंगेल.

राज्य अजिंक्यपद स्पर्धेच्या निमित्ताने पहिल्यांदाच ठाणे येथे बिबट्या या बोधचिन्हाचा वापर करण्यात येत आहे. अहिल्यानगर येथे झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बारशिंगे याचा बोधचिन्ह म्हणून वापर करण्यात आला होता.

सर्व सामने मातीच्या सह क्रीडांगणावर खेळविण्यात येणार असल्यामुळे त्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील. कबड्डी रसिकांना खेळाचा आनंद मनमुराद घेता यावा म्हणून दहा हजार क्षमतेची प्रेक्षक गॅलरी उभारली जाणार आहे.

सर्व संलग्न जिल्हा संघानी आपले संघ १८ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यानंतर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित करावे. त्याच दिवशी खेळाडूंची वजने घेतली जातील. रेल्वेने येणाऱ्या संघाकरिता ठाणे रेल्वे फलाट क्रमांक १वर स्वागत कक्ष उभारण्यात येणार आहे. जिल्हा संघांनी आपल्या आगमनाची पूर्वसूचना दिल्यास त्यांना स्पर्धेच्या ठिकाणी पोहचविण्याची व्यवस्था करता येईल, अशी माहिती एका पत्रकाद्वारे स्पर्धा आयोजन समितीचे प्रमुख संजय वाघुले (अध्यक्ष, विश्वास सामाजिक संस्था) आणि जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष कृष्णा पाटील व सचिव मालोजी भोसले यांनी दिली.

# तिरंदाज शर्वरी म्हामुणकरची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**माणगाव : बातमीदार**

डेरवण (रत्नागिरी) येथे झालेल्या १६व्या मिनी सब ज्युनिअर राज्यस्तरीय धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धेत माणगावमधील शर्वरी गीतांजली समीर म्हामुणकर हिने वयोगट १३ कंपाउंड या प्रकारात ३६० पैकी ३२१ पॉइंट मिळवून चमक दाखवली. याबद्दल तिची आंध्र प्रदेशमधील गुंटूर येथे २० ते २९ मार्च रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.



शर्वरीला तिच्या शाळेतील क्रीडा शिक्षक मंदार चवरकर यांचे मार्गदर्शन लाभत असून प्रशिक्षक बाळू ढेबे व ओंकार घाडगे यांच्या मार्गदर्शनाखालीही सराव करते. तिरंदाजी खेळासाठी आवश्यक अशा कोणत्याही विशेष सोयीसुविधा रायगड जिल्ह्यातील तालुकास्तरावर उपलब्ध नसूदेखील यावर मात करीत रायगडच्या लेकीही आता मागे राहिलेल्या नाहीत.

शर्वरीचे आईवडील दोघेही नोकरीला असले तरी तिच्या हौशी आजी आजोबा आणि भाऊ यांचे तिला जास्त प्रोत्साहन मिळाल्याचे तिने म्हटले आहे. आपल्या या यशाबद्दल सांगताना तिने शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

## खांदा कॉलनीत उद्या महिला मॅरेथॉन

**पनवेल** : माजी नगरसेवक स्व. संजय भोपी यांच्या संकल्पनेतून साकारलेली 'एक धाव आरोग्यासाठी... महिला सशक्तीकरणासाठी' ही महिला दिनाचे औचित्य साधून होणारी महिला मॅरेथॉन या वर्षीही ९ मार्च रोजी खांदा कॉलनीतील महात्मा शाळेचे मैदान येथे सकाळी ५ वा. आयोजिण्यात आली आहे.

आनंदी ग्रुप, स्व. संजय भोपी प्रतिष्ठान, मॉर्निंग योगा ग्रुप, अलर्ट सिटीझन फोरम, खांदा कॉलनी बॅडमिंटन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भारत–न्यूझीलंड अंतिम सामना पावसामुळे रद्द झाल्यास विजेता कोण?

**दुबई : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा अंतिम सामना खेळवला जाणार आहे. हा सामना ९ मार्चला दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाईल. या दरम्यान जर पावसामुळे हा अंतिम सामना रद्द झाला तर विजयी संघ कसा ठरणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मध्ये अजूनही अपराजित आहे. प्रथम भारताने गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकले, त्यानंतर उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा पराभव केला, तर न्यूझीलंड संघाने गट टप्प्यात भारताविरुद्ध केवळ एकच सामना गमावला आहे. म्हणजेच हा सामना मोठआ अटीतटीचा होण्याची शक्यता आहे.

यंदाच्या या स्पर्धेत भारत आणि न्यूझीलंडचे संघ एकदा गट टप्प्यात आमनेसामने आले होते, तेव्हा टीम इंडियाने विजय मिळवला होता, मात्र सध्या न्यूझीलंड संघही चांगल्या फॉर्मात आहे.

आता अंतिम सामन्यात जर पाऊस पडला आणि सामना थांबला तर आयसीसीने राखीव दिवसाचीही व्यवस्था केली आहे. म्हणजे जर ९ मार्चला सामना होऊ शकला नाही तर तो १० मार्चला सामना खेळवला जाईल. जर ९ मार्चला अर्धा सामना खेळवण्यात आला आणि पावसामुळे सामना थांबवावा लागला, तर १० मार्चला पुन्हा तिथूनच सामना खेळवण्यात येईल, जेणेकरून दोन्ही संघांना जेतेपद पटकावण्याची बरोबरीची संधी मिळेल.

आयसीसीनुसार अंतिम सामना पूर्ण व्हायला हवा. हे शक्य नसल्यास संयुक्त विजेते घोषित केले जातील. अंतिम फेरीत आधी खेळलेल्या सामन्यांच्या आधारे निर्णय घेतला जाणार नाही. सामन्याच्या दिवशी जो संघ विजयी होईल तो जेतेपद पटकावेल, परंतु 'अक्क्युवेदर'च्या अहवालानुसार दुबईमध्ये ९ मार्चला पाऊस पडण्याची शक्यता नाही.

## सुनील छेत्रीने निवृत्ती का घेतली मागे?

**कोलकाता** : भारताचा स्टार फुटबॉलपटू सुनील छेत्रीने निवृत्ती मागे घेतली असून तो ४०व्या वर्षी भारतासाठी पुन्हा खेळताना दिसणार आहे.

सुनील छेत्री हा भारतासाठी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. त्याने गेल्या वर्षी जूनमध्ये निवृत्तीची घोषणा केली होती, पण आठ महिन्यांनंतर तो भारताच्या फुटबॉल संघात पुनरागमन करत आहे. भारताच्या फुटबॉल संघाचे सोशल मीडिया पेज इंडियन फुटबॉल यावर पोस्ट करत ही माहिती देण्यात आली. आगामी फिफा आंतरराष्ट्रीय विंडोमध्ये भारतीय संघाला मदत करण्यासाठी सुनील छेत्रीने हा निर्णय घेतला आहे. २५ मार्च रोजी बांगलादेशविरुद्ध एएफसी आशियाई चषक २०२७ पात्रता फेरीच्या तिसऱ्या फेरीत तो खेळणार आहे.



सौजन्य : सुधीर घरत (जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी ट्रान्सपोर्ट सेल (उत्तर रायगड))







सौजन्य : श्री. भूपेंद्र पाटील (माजी पं. स. सदस्य, पनवेल)

।। श्री गजानन प्रसन्न ।। ।। ज्ञानेश्वर माऊली ।। ।। श्री विठ्ठल रखुमाई प्रसन्न ।। ।। तुकाराम महाराज ।। ।। ॐ नम: शिवाय ।



श्री विठ्ठल रखुमाई मंदिर वार्षिक उत्सव (वर्ष ३८ वे)
स्वानंदसुखनिवासी ह.भ.प.वै. शंकर सखाराम पाटील (आप्पा)
ह.भ.प.वै. आनंदीबाई शंकर पाटील (आई) यांचा पुण्यस्मरण सोहळा
ठिकाण - मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड.


ह.भ.प.वै. शंकर सखाराम पाटील (११ वा पुण्यस्मरण सोहळा)



ह.भ.प.वै. आनंदीबाई शंकर पाटील (१ ला पुण्यस्मरण सोहळा)

समस्त भाविक जनता जनार्दनास कळविण्यास आनंद होतो की, आमचे पिताश्री ह.भ.प. वै. शंकर सखाराम पाटील (आप्पा) आणि ह.भ.प. वै. आनंदीबाई शंकर पाटील (आई) यांनी सन १९८७ साली स्थापन केलेल्या विठ्ठल रखुमाई मंदिराचा सोहळा व मंदिराचा ३८ वा वार्षिक उत्सव, ह.भ.प. वै. आप्पांचा अकरावा व आईचा प्रथम पुण्यस्मरण सोहळा शनिवार दि. ८ मार्च २०२५ ते रविवार दि. ९ मार्च २०२५ रोजी गुरुवर्य पू. देहूकर माऊली व संत सज्जनांच्या आशिर्वादाने व भाविक सज्ञानांच्या सहकार्याने गुरुवर्य वै. ह. भ. प. सावळाराम महाराज व वै. ह.भ.प. भागोजी महाराज (सांगडे) यांच्या कृपेने कै. सखाराम गणू पाटील, कै. लक्ष्मीबाई सखाराम पाटील कै. सदू गणू पाटील, कै. जनाबाई सदू पाटील, वै. नारायण सखाराम पाटील, वै. भिमाबाई नारायण पाटील यांच्या आशीर्वादाने हा महोत्सव संपन्न होत आहे. तरी समस्त भाविक भक्तांनी या सोहळ्यास अगत्य येऊन कीर्तन, भजन इत्यादी कार्यक्रमात सहभागी होऊन आम्हास उपकृत करावे व कार्यक्रमाचा आनंद व्दिगुणीत करावा ही नम्र विनंती.

शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी — कार्यक्रम

सकाळी ८ ते ९ वा. : श्रीं च्या मूर्तीचा अभिषेक व पूजन
सकाळी ९ ते ११ वा. : श्री सत्यनारायणाची महापूजा व तिर्थप्रसाद
दुपारी १२ ते १ वा. : श्री ग्रामदेवता प्रासादीक भजन मंडळ, नेरे भजन अलंकार गुरुवर्य ह.भ.प. श्री. रंभाजीबुवा पाटील यांचे शिष्य बुवा : ह.भ.प. रुपेशबुवा पाटील, पखवाज : परेश पाटील, तबला : कल्पेश पाटील
दुपारी १ ते २ वा. : गावदेवी प्रासादीक वारकरी भजन मंडळ, वाकडी
दुपारी २ ते ४ वा. : श्री हनुमान प्रासादिक वारकरी भजन मंडळ, पालीखुर्द गुरुवर्य ह.भ.प. रामदास लक्ष्मण शेळके यांचे शिष्य गायक : ह.भ.प. पंढरीनाथ शेळके, ह.भ.प. मनोहर कडव, ह.भ.प. पंढरीनाथ पाटील (मोहो), मृदुंगमणी : सुरज पाटील (चावणे), गणेश पाटील (चावणे), चालक : ह.भ.प. वामनशेठ शेळके, कान्हा शेळके, महादेव शेळके, दशरथ पाटील, गंगाराम शेळके
सायं. ४ ते ५ वा. प्रवचन – ह.भ.प. रोहीणी मानकामे (नेरे)
सायं. ५ ते ८ वा. : हरिपाठ व दिंडी सोहळा दिंडी चालक – ह.भ.प. पुंडलिक महाराज (मोहो), ह.भ.प. शांताराम फाटे (कोपरी), ह.भ.प. ज्ञानदेव पाटील (बोर्ले)
रात्रौ ८ ते १० वा. : किर्तन – ह.भ.प. गायनाचार्य उत्तम महाराज बडे (देवाची आळंदी) मृदुंगसाथ : धनंजय खुटले (नेरेपाडा), किर्तनसाथ : सोमनाथ आपटेकर


ह.भ.प.गायनाचार्य उत्तम महाराज बडे (सोमनाळ देवाची आळंदी)


ह.भ.प.पद्माकर महाराज पाटील (अध्यक्ष, कोंकण दिंडी)

रविवार दि. ९ मार्च २०२५ रोजी

सकाळी १० ते १२ वा. काल्याचे कीर्तन ह.भ.प. पद्माकर महाराज पाटील (अध्यक्ष, कोंकण दिंडी आकुर्ली)

प्रमुख उपस्थिती

मा. खासदार श्री. रामशेठ ठाकूर (पनवेल), मा. आमदार श्री. प्रशांतदादा ठाकूर (पनवेल), मा. श्री. प्रल्हाद रामा पाटील (चिर्ले), मा. श्री. भरतशेठ ठाकूर (शिवाजीनगर), मा. श्री. मनोहर म्हात्रे (धा. खांदा), मा.श्री. बबनदादा पाटील (त.मजकूर), मा. श्री. मनोहर म्हस्कर (बदलापूर), मा. श्री. किशोर रघुनाथ भोईर (कोपरी – ठाणे), मा. श्री. ललित म्हात्रे (तुर्भे), मा. श्री. राम दाजी राणे (नेरळ), मा. श्री. जगदीश म्हस्कर, मा.श्री. वासुदेव गवते, मा.श्री. महादेव चोरमेकर ( वावंजे), मा. श्री. सुदाम शिवदास भगत (मुंब्रा), मा. श्री. प्रभाकर रतन चौधरी (ताडाळी ), मा. श्री. नारायण ठाकूर (धुतूम)

आपले स्नेहांकित

श्री. दत्तात्रेय शंकर पाटील — ह.भ.प. सौ. सुलोचना दत्तात्रेय पाटील
श्री. संजय शंकर पाटील — ह.भ.प. सौ. छाया संजय पाटील
ह.भ.प. श्री. संभाजी शंकर पाटील — सौ. सुमती संभाजी पाटील

ग्रामस्थ मंडळ, नेरे साऊंड सर्व्हिस (निलेश पाटील)